मला दिसलेला

चीन

डॉ. नीलिमा कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

मला दिसलेला चीन

(प्रवासवर्णन)

लेखिका : डॉ. नीलिमा कुलकर्णी

या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

मला दिसलेला चीन हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

पण तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या, मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मला दिसलेला चीन

लेखिका - डॉ. नीलिमा कुलकर्णी
Address - D/28, palm Acres Society, M. Phule Road, Mumund(E), Mumbai -400 081.
Phone - 09619911705.
Mail - drneelimakulkarni@gmail.com

Photo: डॉ. नीलिमा कुलकर्णी, पुनम सिंगवी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ नोव्हेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

डॉ. नीलिमा कुलकर्णी.

MSc; MSc; PhD; DHE; PGD in NGO managemant; successfully completed certificate course in translation skills (English-Marathi) by IIKEM, Thane, Maharashtra.

शैक्षणिक

1. स्टेट आणि नेशनल स्कॉलर
2. मुंबई येथील वझे महाविद्यालयातून, प्राणीशास्त्र - विभाग प्रमुख पदावरून २०१५ मध्ये निवृत्त
3. एक शिक्षक म्हणून ३९ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव (यु जी आणि पी जी स्तरावर)
4. मुंबई विद्यापीठातील प्राणीशास्त्र विषयातील पी एच डी मार्गदर्शक –
5. २ विद्यार्थ्यांना पी एच डी साठी, ३ विद्यार्थ्यांना पी जी प्रकल्पासाठी मार्गदर्शन तसेच अनेक विद्यार्थ्यांना यु जी प्रकल्पांसाठी मार्गदर्शन.
6. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग आणि शोध निबंध वाचन
7. शोध निबंध प्रकाशित.
8. मुंबई विद्यापीठाच्या अनेक संशोधन प्रकल्पांमध्ये प्रकल्प प्रमुख किवा प्रकल्प सहाय्यक म्हणून सहभाग.
9. अनेक शैक्षणिक आणि कॉर्पोरेट आस्थापनात पर्यावरण विषयक भाषणं

10. ‘हरियाली’ या पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची - मुलुंड विभाग प्रमुख
11. प्राणीशास्त्र विषयातील ४ पुस्तके प्रकाशित
12. पर्यावरण क्षेत्रातील कामासाठी समाजसेवी पुरस्कार -२०१८, जेष्ठ नागरिक संघ, मुलुंड तर्फे

साहित्य

1. डॉ. अभिजित कुलकर्णी यांच्या एन बी टी ने प्रकशित केलेल्या दंतवैद्यकशास्त्रा संबंधित्त पुस्तकाचा अनुवाद, एन बी टी कडून प्रकाशित.
2. ‘कुमारकोश’ साठी नोंदींचे लिखाण
3. ‘विश्वकोश’ साठी लिखाण, प्राणीशास्त्र मंडळाची सभासद.
4. १९९५ पासून आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या परिसर, ऐसी अक्षरे रसिके, चिंतन, झळा या लागल्या जीवा, अशा कार्यक्रमांसाठी लेखन.
5. ‘आपलं पर्यावरण’ या मासिका साठी गेली १२ वर्ष लेखन.
6. ‘विवेक’ मध्ये प्रकाशित लेख आणि ‘जीवजागर’ हे सदर.
7. २०२० मधील लोकसत्ताच्या ‘कुतूहल’ सदरासाठी लेखन
8. ‘मुलुंड नागरिक’ साठी लेखन.
9. ‘हरियाली’च्या विवध उपक्रमांच्या प्रसिध्धीसाठी केलेले लेखन.
10. Successfully Completed certificate course in Translation skills (English – Marathi) conducted by Indian Institute of Knowledge Engineering & Management .

मला दिसलेला चीन

१८ जुलै, २००७ ला कॉन्फरन्ससाठी हॉंगकॉंगला जाण्याचे ठरविल्यापासून एक्सायमेंट होतीच.त्याला कारण ही तसेच होते. २००५ साली ‘सीएटल’ अमेरिका, येथे दोन शोधनिबंध स्वीकारले गेले, जाण्याचे ठरले, इतर तयारी झाली परंतु अमेरिकेने मला व्हिसा नाकारल्यामुळे मला जाता आले नव्हते. अर्थात नुकसान त्यांचेच झाले हे नक्की... असो. एकूण काय परदेशी जाऊन शोधनिबंध वाचण्याची उत्सुकता होतीच. प्रो. सिंगवी, प्रा. ओक, मी डॉ. कुलकर्णी आणि डॉ. थत्ते असे आम्ही चौघे जाणार असे ठरत होते कारण, abstract चौघांच्या नावाने पाठविले होते. परंतु डॉ. थत्ते आणि प्रा. ओक यांना काही कारणामुळे त्यात भाग घेता येणार नव्हता. त्यांनी हे कळविल्यावर मग मी आणि प्रो. सिंगवी यांच्या नावाने पेपर पाठविला गेला. या सिम्पोसियमचे १५ वे वर्ष होते. दर दोन वर्षांनी हे सिम्पोसीयम असते. इंटरनेशनल कॉन्सोर्शियम फॉर सोशल डेव्हलपमेंटही (ICSD) तशी प्रथितयश संस्था – अनेक सामाजिक प्रश्नांचा उहापोह करणारी... त्याचा अभ्यास करणारी अशी ही संस्था.या वर्षी समाज विकास आणि पर्यावरण असा विषयही होता. त्यामुळेच

आम्ही abstract पाठविले, ते स्वीकारले गेले, आणि पुढचा शोधनिबंधवाचन पर्यंतचा प्रवास घडून आला. मी, सिंगवी सर आणि मॅडम – म्हणजे सरांची पत्नी असे जाण्याचे निश्चित झाले, आम्ही तिघे म्हणजे इन, मीन, आणि तीन असे नामकरण झाले, सरांनीच दिलेली नावे...चीनी लोकांच्या नावात मिसळून उच्चारली तर सहज चीनी म्हणून खपून जावीत. पहाटेची फ्लाईट होती. रात्री पाउणच्या सुमारास ऐयरपोर्टवरच भेटायचे ठरले. मला सोडायला माझा नवरा आणि मुले आले होते. तेथे पोचल्यावर, भेट झाल्यावर आणि जुजबी बोलणे झाल्यावर आम्ही आत गेलो आणि सोडायला आलेली मंडळी परतीच्या वाटेला लागली. आम्ही एयरइंडियाच्या काउंटरवर गेलो तर तिथे कळले कि हॅंडलगेज मध्ये कोणतेही खाण्याचे सामान असून चालणार नाही. मी माझ्या एका बॅ्गेला कुलूप लावले होते आणि दुसरी हॅंडलगेज म्हणून घ्यायची असे ठरल्याने तिला कुलूप लावण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु ती बॅग आता हातात ठेवता येणार नव्हती. अखेर ती कुलूप नसलेली वरून पूर्ण चेन असलेली बॅग सामानाबरोबर द्यावी लागली.त्याच वेळी माझ्या लक्षात आले कि बॅ्गेच्या तळाशी एका पाकिटात पैसे ठेवले होते. बॅग आत गेली आणि मग माझ्या लक्षात आले त्यामुळे आता काहीच उपयोग नव्हतं. भगवान ‘भरोसे’ असे म्हणत तो विचार मनातून काढून टाकण्याचा प्रयत्न केला. इमिग्रेशन, सिक्युरिटी वगेरे सोपस्कार उरकून आम्ही आमच्या ११ नंबरच्या गेट जवळ येऊन बसलो.

२० रुपयाला एक असा चहा प्यायलो. एयरपोर्टचा चहा होता तो... थोडे पेंगलो, थोड्या गप्पा मारल्या तोपर्यंत पाऊणे चार वाजता उद्घोषणा झाली. आम्ही विमानाकडे प्रयाण केले आणि विमानात बसलो. उड्डाणाची वेळ १८ जुलै २००७ ला पहाटे ४:३० ची होती. आम्हाला मधल्या सीट मिळाल्या होत्या पण तशा आरामशीर होत्या.. खरं म्हणजे कॉन्फरन्स १६ जुलैला सुरु होती परंतु आम्ही १८ जुलै ला जाण्याचे ठरवले कारण १७ तारखेला एयरइंडियाची फ्लाईट नव्हती. १६ ते २० जुलै म्हणजे ५ दिवस ‘ समाज विकास’ आम्हाला झेपेल का अशी शंका वाटून, नव्हे आम्हाला तो झेपणार नाहीच असे ठरवूनच आम्ही १८ ला जाण्याचा निर्णय घेतला होता. म्हणजे अडीच दिवस आम्ही त्या सिम्पोझीयम मध्ये हजेरी लावली. आमचा पेपर १९ तारखेला होता. पण नंतर असेही वाटले कि ५ दिवसात जास्त लोकांशी ओळखी झाल्या असत्या आणि गाव, देश, माणसं जास्त चांगली समजली असती. असो. हा मुद्दा पुढील कॉन्फरन्ससाठी लक्षात ठेवायला हवा. खरं म्हणजे मी ‘कॅथे पेसिफिक’ ने जावे या मताची होते परंतु सर नेहमी एयर इंडिया ने प्रवास करतात त्यामुळे त्यांचा कल आणि प्रचंड विश्वास एयर इंडिया बरोबर होता. मी खूप वर्षांपूर्वी मुंबई- लंडन असा प्रवास केला होता एयर इंडियाने... .तेव्हाचा अनुभव वाईट होता असे नव्हे कारण खरं सांगायचं तर मला फारसं आठवत नव्हतं (एकतर पहिलाच विमान प्रवास, बरोबर लहान मुलगा, आणि इतर टेन्शन्स).

तरीसुध्धा पेपरातील काही बातम्या, त्यांचे संप, फ्लाईट उशिरा सुटणे या मुळे सर्विसची अवस्था फारशी चांगली नसावी असे माझे मत बनले होते. परंतु प्रवास अखेर एयरइंडियाने सुरु झाला आणि मला सुखद धक्काच बसला. अगदी विमानात पाय ठेवल्यापासून हवाई सुंदऱ्या अधिक चपळ आणि व्यावसायिक वाटल्या. एकूणच कंटाळलेपणा, सुस्तपणा याचा मागमूसही नव्हता. त्या हसऱ्या आणि खुश दिसत होत्या आणि सर्वांचे हार्दिक स्वागत करीत होत्या. मला नेहमी पडणारा प्रश्न... या हवाई सुंदऱ्यानी दारात उभे राहून विमानात बसणाऱ्या प्रत्येल प्रवाशाचे स्वागत करण्याची खरच गरज असते का? एस टी, लक्झरी बस, ट्रेन या ठिकाणी अशाप्रकारे स्वागत करायला कोणी असते का? ट्रेनने तर आपण कित्येक तास प्रवास करतो. जसे तिकीट असेल त्यानुसार प्रवासी मुकाट्याने आपापल्या सीटवर जाऊन बसतात. तिथे कोण असते त्यांचं स्वागत करायला? असो... आम्हाला सुस्वागतम...वेलकम... असेच काहीसे म्हणत दारातील सुंदरीने आम्हाला पुढील सुंदरीच्या हवाली केले. तिने आम्हाला आमच्या सीट्स दाखविल्या. आम्ही स्थानापन्न झालो. विमानात सर्व प्रकारच्या सूचना सुरु झाल्या आणि विमान हळुहळू चालू लागले. मुख्य रनवे वर आल्यावर ते प्रचंड वेगाने पळू लागले आणि एका क्षणी त्याने हवेत भरारी घेतली. कानात दडे बसले, कानात इयरप्लग घातले आणि आमचा प्रवास सुरु झाला. विमान वेळेवर सुटले आणि आता ढगांच्याही वर ते स्थिर

झाले. आता काय करावे असा विचार करत असतांनाच ज्यूस समोर आला, चहा-कॉफी, गरम गरम ब्रेक फास्ट, केक, जेवण असे सतत काही ना काही समोर येतच राहिले. खाल्लेले अन्न खाली उतरायच्या आधीच दुसरे काहीतरी... अरे बापरे... आमची पोटे म्हणजे यांना पसरणाऱ्या पोतड्या वाटल्या कि काय? हे अन्नसत्र सुरु असतांना सिनेमा पाहणे, म्युझिक ऐकणे, हे सुध्धा सुरु होते. परंतु म्युझिक फारसे चांगले नव्हते, चॉइस सुध्धा फारसा नव्हता...दर्जेदार सिनेमा, दर्जेदार संगीत याची तशी वा न वा च होती.साधारण २ तास ४५ मिनिटांनी आम्ही बँकॉकच्या ‘स्वर्णभूमी’ एयरपोर्टला पोचलो. विमानतळ येण्या पूर्वी, आपण किती उंचीवर आहोत, बाहेरील तापमान किती आहे, किती वेळ विमान इथे थांबणार आहे या गोष्टींची माहिती दिली गेली. उतरणाऱ्या प्रवाशांकडून एक फॉर्म भरून घेत होते. आम्ही पुढे हॉंगकॉंगला जाणार असल्याने आम्ही तो फॉर्म भरला नव्हता. बँकॉक ही थायलंड ची राजधानी... एयरपोर्ट सुंदर होता परंतु आम्हाला विमानातच बसून राहण्याच्या सूचना होत्या. विमान येथे १ तास थांबणार होतं. काही प्रवासी उतरणार होते, तर काही प्रवासी येथून चढले देखील... एका गोष्टीचे खूप अप्रूप वाटले. उतरणारे प्रवासी बाहेर पडले आणि लगेचच एयरपोर्ट वरील सफाई कामगार पटापट विमानात शिरले. त्यांनी आमच्यासकट विमानाचा ताबाच घेतला जणू... मोकळया सीट वरील सगळी कव्हर्स बदलली, सीट्स व्हाक्युमने स्वच्छ केल्या, कचरा उचलला आणि अर्ध्या

तासात ती टीम बाहेर देखील पडली. कुठे गडबड नाही, गोंधळ नाही, प्रत्येकजण स्वतःचे काम व्यवस्थित करून मोकळा होणार...सर्वांची उंची, रंग, ठेवण आणि हेल काढून किरटे बोलणे सारखेच...मात्र या मध्ये मुलींचे प्रमाण जास्त..हे सर्व बाहेर पडताच नवीन प्रवासी येण्यास सुरुवात झाली. आम्हाला खरं तर थोडे पाय मोकळे करावेसे वाटत होते पण तेव्हढा वेळच नव्हता आणि आम्ही विमान प्रवास करत होतो ना... .असो. आमचा पुढील प्रवास म्हणजेच बँकॉक – होंगकोंग प्रवास सुरु झाला. पुढे साडे तीन तासांचा प्रवास होता. खाण, पिणं, झोप, गप्पा, सिनेमा पाहणे असा सगळा कार्यक्रम सुरु होता. आम्ही लोकल टाईम दुपारी ३:२० वाजता हॉंगकॉंगला पोचलो. आपल्या आणि तिथल्या वेळेत साधारण ३ तासांचा फरक आहे. एयरपोर्ट खूप मोठा, स्वच्छ आणि सुंदर आहे. २-४ जीने चढून- उतरून, अखेर ट्यूबने आम्ही आमचे सामान होते तेथे पोचलो. सामान ताब्यात घेऊन, इतर सोपस्कार संपवून आम्ही बाहेर आलो. एके ठिकाणी आमच्या स्वायर ट्रावेल्सने दिलेली पावती दाखवून आम्ही जेथून कोचेस सुटत होते तिथे येऊन थांबलो. १० मिनिटात आमचा कोच आला. हॉंगकॉंगचा एयरपोर्ट मुख्य आयलंड पासून लांब आहे. आमच्या सारखीच इतर माणसेही कोचसाठी थांबलेली होती. समुद्र एयरपोर्टच्या इतक्या जवळ आहे कि वैमानिकाचा अंदाज जरा जरि चुकला तरी विमान समुद्रातच जाईल..कोच मधून जातांनाही एका बाजूला सतत समुद्र दिसत राहतो.

मोठा रोप ब्रिज, बंदरात उभे असलेले कंटेनर्स, क्रेन्स, रस्त्याचा दुतर्फा झाडे, स्वच्छ रस्ते हे सगळे पाहतांना सिंगापूरची आठवण झाली. आम्हाला जायचे होते ‘कावलुव’ला. कावलूव जसे जवळ येऊ लागले तसे मुंबईत आल्यासारखे वाटू लागले. रस्ते, इमारती, दुकाने, अगदी आपल्या मुंबईतल्या सारखे... एक गोष्ट मात्र नक्की ती म्हणजे ते सर्व मुंबईसारखे दिसत असले तरी स्वच्छतेच्या बाबतीत चित्र अगदी वेगळे होते. आणखी एक प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे रस्ते कोठेही खोदलेले नाहीत, रस्त्याची कामे करतांना पादचारी किवा वाहनचालकांना आणि वाहतुकीला कमीतकमी त्रास होईल याची घेतलेली काळजी सहज दिसून येत होती. रस्ता क्रॉस करतांनाची शिस्त देखील वाखाणण्या सारखी, म्हणजे आपण शिकण्यासारखी. पादचारी वाहनांचा मन राखणार आणि वाहने पादचाऱ्यांचा... किती छान. अखेर १ तासाच्या प्रवासानंतर आम्हाला कोचने YWCA (आमचे राहण्याचे ठिकाण) च्या दारात सोडले. आमच्या २ रूम्स आरक्षित होत्या. तेथील ऑफिस मधील सर्व व्यवहार उरकून आम्ही ६ व्या मजल्यावर गेलो. खोल्या चांगल्या होत्या. एव्हाना संध्याकाळचे ६ वाजले होते. आम्ही थोडे ताजे तवाने होऊन आणि थोडेसे खाऊन त्या दिवशीच्या कॉन्फरन्सच्या ‘प्रेसिडेंट डिनर’ साठी निघालो. खाली आलो आणि तेथे असलेल्या एकमेव व्यक्तीला पत्ता विचारून बाहेर पडलो. त्याला देखील फारसे इंग्रजी कळत नव्हते. त्याने पॉलीटेकनीक युनिव्हर्सिटीला

जाणारी ८ नंबरची बस सांगितली होती. परंतु थोडा वेळ बसची वाट पाहून आम्ही टॅक्सीने जाण्याचे ठरवले. इथे आपल्यासारखे हात दाखविला कि टॅक्सी मिळत नाही, ती स्टेन्डवरूनच घ्यावी लागते. गम्मत म्हणजे टॅक्सीमध्ये बसल्यावर आम्हाला कळले कि आम्ही विरुध्ध दिशेला जाणाऱ्या बस थांब्यावर उभे होतो. असो. डिनरची वेळ ७ ते ९ अशी होती त्यामुळे आम्हाला लवकर पोहोचणे भाग होते..आम्ही पोली. यु. मधील जॉकी क्लबला पोचलो. एक गोष्ट जराशी खटकली ती म्हणजे तेथे कुठेच कॉन्फरन्स विषयीचे फलक नव्हते. इतकेच काय त्याविषयी कोणाला माहितीही नव्हती. आम्ही बहुतेक पत्ता चुकलो होतो परंतु तेथील प्रत्येक व्यक्ती आम्हाला मदत करण्याचा मनापासून प्रयत्न करीत होती. तिथल्या एका मुलीने आम्ही दिलेल्या नंबरवर फोन करून केंटोनी भाषेत बोलून आमची अडचण त्या समोरील व्यक्तीला सांगितली. पलीकडून सांगितलेला पत्ता चीनी भाषेत लिहून घेऊन आम्हाला दिला म्हणजे आम्ही तो टॅक्सीवाल्याला दाखवू शकू... आम्ही तो इंग्रजीतपण लिहून घेतला. आम्ही त्या जागेच्या जवळपासच होतो. सुरुवातीला मजा वाटली परंतु नंतर थोडा रागही यायला लागला..आपल्याकडे कॉन्फरन्सच्या ठिकाणी मोठे फलक, दिशादर्शक वगेरे असतात तसे फारसे नव्हते. हे सगळे होईपर्यंत ८:०० वाजले. डिनरला जावे कि नाही असा एक विचार डोके वर काढू लागला होता. परंतु आता आमच्याकडे १ तास होता, आम्ही त्या जागेच्या जवळ होतो आणि

आमच्याकडे चीनी भाषेतील पत्ता सुध्धा होता. टॅक्सी साठी चालत जातांना आम्ही आमचा निर्णय बदलला. टॅक्सी मध्ये बसलो पण वळवली डिनरच्या ठिकाणी..आणि अक्षरशः १० मिनिटात पोचलो. डिनर रंगात आले होते.स्टेजवर विविध देशातील लोकांनी आणलेल्या वस्तूंचे ऑक्शन सुरु होते. आम्हाला या गोष्टीची आधीच कल्पना दिली होती. आम्हीपण काही गिफ्ट्स आणल्या होत्या. मी एक छोटा गणपती आणि सिल्क चा एक स्कार्फ आणला होता परंतु आम्हाला उशीर झाल्यामुळे आमच्या गिफ्ट्सचे लिस्टिंग झाले नाही. आम्ही त्या मोठ्या प्रकाशित अशा हॉलमध्ये एका टेबलाशी बसलो. अनेक टेबल होती आणि मजेत हास्य विनोद सुरु होते.व्हेज – नोन व्हेज, इतर खाद्य पदार्थांची रेलचेल, आणि प्रेमाने, आग्रहाने खायला घालणारे स्वयंसेवक. त्यामध्ये मुली जास्त...सर्वात प्रथम त्यांचा तो “चा” म्हणजे हर्बल चहाचे कोमट पाणी जे बिनकानाच्या कपातून पितात. मला तो चा आवडला. नंतर सोफ्ट ड्रिंक्स, ज्यूस, सूप, कुकीजची पेकेट्स आणि अनेक नवनवीन पदार्थ... ..आम्ही त्या टेबलाशी बसलेल्या सर्वांशी ओळक करून घेतली, आमची ओळख दिली.

दोघे भारतातून आलेले तर दोघे ब्राझीलहून... इनामदारांचा रिसर्च पाण्याचे व्यवस्थापन या क्षेत्रात होता तर ब्राझीलच्या जोडीचे काम एड्स आणि स्त्रिया यावर होते. एकूणच वातावरण एकदम मस्त होते...बरं झालं आम्ही येण्याचा निर्णय घेतला.. मुंबईचे आणखी ४-५ जण होते. आम्ही स्टेजवर जाऊन“से चेन” (संयोजक) यांच्या बरोबर फोटो काढला.

The 15th ICSD Symposium
16 - 20 July 2007 Hong Kong, China
ICSD
Pres ent's Dinner 主席晚宴

The 15th ICSD Symposium
16 - 20 July 2007 Hong Kong SAR, China
Seeking Harmony and
Promoting Social Development
in a World of Conflict
आमची देशी टीम

तिथेच मला मुंबईची एक मैत्रीण भेटली. खूप मजा आली. सुंदर झुंबरे, छान छान कपड्यातील माणसं, उत्तम खाण्याचे पदार्थ, हलकसं संगीत आणि गोड हसून खाऊ घालणाऱ्या चीनी स्वयंसेवक... सगळे कसे छान होते... आता कॉन्फरन्सला आल्यासारखे वाटत होते. आम्ही खुश होतो. नव्या ओळखी, कार्डांची देवाण घेवाण, तुमचा पेपर कधी – आमचा कधी या विषयीच्या गप्पा...एव्हाना १०:३० वाजले. निरोप घेऊन, बाहेर पडून टॅक्सी पकडून YWCA ला परतलो. खरं म्हणजे परत येण्यासाठी कोचची व्यवस्था होती पण आम्हाला त्याचा पत्ताच नव्हता. असो... आता मात्र झोप खूप आली होती.. सुरुवात तर चांगली झाली होती. अखेर आम्ही ११:३० ला निद्राधीन झालो.ज्या कारणासाठी आम्ही इतक्या लांब आलो होतो तो दिवस, १९ जुलै उजाडला, आमच्या पेपर प्रेझेन्टेशनचा. सकाळी लवकरच पोली. युनि. ला पोचण्याचे ठरविले आणि आता आम्हाला जागाही माहितीची होती. सर्व उरकून बरोबर ८:०० वाजता निघण्याचे ठरवले होते. **चहा प्यायला** तिथल्या उपहारगृहात गेलो आणि फक्त चहा घेतला कारण बाकीच्या गोष्टी महाग वाटल्या. १ चहा – १६-१८ हॉंगकॉंग डॉलर x ७ रुपये... .हा हिशोब करून आम्ही फक्त चहाच प्यायला आणि रूमवर आलो. सगळी तयारी म्हणजे, सी डी, पेन ड्राईव्ह, पेपरची प्रत, वगेरे घेऊन शेवटी टॅक्सी करूनच पोली यु. ला पोचलो. आज मात्र येथे चहलपहल होती. स्वयंसेवकांची गडबड, रजिस्ट्रेशनच्या तिथे गर्दी, आणि सगळीकडे

उत्साहाचे वातावरण... आम्ही देखील औपचारिकपणे रजिस्ट्रेशन केले, आमच्या फाईल घेतल्या, आणि आम्ही देखील तेथील लोकांच्यात मिसळलो. काल भेटलेले डॉ.पवार भेटले. ते १६ तारखेपासून आले होते त्यामुळे त्यांनी आम्हाला तिथल्या अनेक गोष्टी दाखविल्या. भाषेचाही थोडा प्रश्न होताच..काही साध्या गोष्टी सुद्धा तिथल्या लोकांना समजत नव्हत्या कारण इंगजी त्यांना येतच नव्हते. आम्ही आमची कुपन्स घेऊन ब्रेकफास्टसाठी कॅन्टीनला गेलो. कॅन्टीनच्या बाहेर पदार्थाच्या नावासकट आणि ते कशाचे बनवले आहे त्याची चित्रदेखील लावलेली होती. यामुळे आपल्याला यातील काय खाता येईल हे ठरवणे सोपे झाले. आम्ही ओम्लेट, सेंडविच, ज्यूस, असे घेतले. प्लेनरी लेक्चर सुरु झाले होते परंतु मधेच आत शिरणे योग्य वाटेना..मग आम्ही तिसऱ्या मजल्यावर असलेल्या activity रूम मध्ये गेलो. तिथे फोने होता, कॉम्पुटर होते, नेट ही सुरु होते. आम्ही आमच्या सी डी तपासल्या आणि पुन्हा एकदा चहा घेतला. तिथेही बऱ्याच ओळखी झाल्या. त्यानंतर आम्ही खोली क्रमांक ३०३ मध्ये पोचलो जिथे आमचे प्रेझेनटेशन होते. आमचा नंबर चौथा होता.

शोधनिबंधाचे सादरीकरण

एक गोष्ट मात्र आम्हाला पटली नाही ती म्हणजे भारतातील सगळे डेलिगेट्स एकाच सेशन मध्ये टाकले होते. पेपर मी आणि सरांनी एकत्रितपणे वाचला. सर्वांना पेपर आवडला. प्रश्नोत्तरेसुध्धा आम्ही दोघांनीही स्वतंत्रपणे दिली. उत्तरांनी प्रश्नकर्त्यांचे समाधान झाले. समांतर सेशन्स सुरु असून सुध्धा पेपर ऐकायला साधारण ५०-६० लोकं होते. त्यातील काही भारतीय होते.सेशनच्या अध्यक्षांनी आमच्या पेपरचे कौतुक केले आणि त्याचा आवर्जून उल्लेख केला. हे सगळे संपेपर्यंत १२:३० वाजले. येथील सर्वच स्वयंसेवक चांगले काम करीत होते, आलेल्या पाहुण्यांची हसतमुखाने काळजी घेत होते. सर्व जण आनंदाने काम करीत होते. एकूणच वातावरण खूप चांगले होते. पायऱ्या चढून आले कि समोरच एक मोठा फुललेला तामण वृक्ष होता, महाराष्ट्राचा राज्य वृक्ष.

तामण वृक्ष

लिफ्ट, फोयर , कॉरीडोर, सगळे कसे स्वच्छ आणि जिथल्या तिथे...प्रत्येक १०० पावलांवर प्रसाधन गृह...मला आपल्याकडील प्रसाधन गृहांची आठवण झाली. आधी शोधा, आणि त्यातील स्वच्छतेबद्दल तर न बोललेलेच, नव्हे न लिहिलेलेच बरे... त्या विरुध्ध इथे स्वच्छता सगळ्याच बाबतीत. मला वाटते हा मूळ वृत्तीतील फरक असावा... असो.. पॉली. यु. चे आवार खूप मोठे होते. 'जी' ब्लॉक मध्ये एक चांगली कार्यशाळा होती १२ वाजता... पण तो ब्लॉक आमच्या येथून खूप लांब होता आणि आम्हाला आमचे सेशन संपायलाच उशीर झाला होता. आम्ही परत activity रूम मध्ये आलो आणि भारतात मेल वगेरे पाठवले आणि जेवणासाठी कॅन्टीनमध्ये आलो... माणसांची जत्राच होती... पण शिस्तबध्ध. आम्हाला प्रत्येकी २५ हॉगकॉग डॉलरची कुपन्स दिली होती... जेवण व्यवस्थित झाले... त्यानंतर आम्ही YWCAला परत आलो. त्या दिवशी दुपारची सेशन्स नव्हती. दुपारी थोडा आराम केला आणि संध्याकाळी जवळच ताय – चाय येथील लेडीज मार्केट, आणि नाथन स्ट्रीटवरील इलेक्ट्रोनिक मार्केटला गेलो. खूप हिंडलो, थोडीफार खरेदी केली. बाजारात भाषेचा प्रश्न फारसा जाणवला नाही कारण कोणाला तरी इंग्रजी कळत होते. विक्रेत्यांना तर इंग्रजी बऱ्यापैकी समजत होते. 'कावलुन' हा होंगकॉग चा पश्चिमेकडील भाग. हॉगकॉग चे ३ भाग – कावलुन, होंगकोंग बेट आणि न्यू टेरीटरीज. हॉगकोंग हा भाग जरी वेगळा असला तरी तो 'ग्रेटर चायना' चा

एक भागच समजला जातो. बाजारात तरुणाची संख्या जास्त आणि त्यातही मुली जास्त...मध्यमवयीन माणसे कमी दिसत होती कि आम्हाला ओळखू येत नव्हती कोणास ठाऊक! सरांचे लेप्टोप आणि एल सी डी प्रोजेक्टर यांचे खरेदीपूर्व संशोधन सुरु होते. या दुकानात मात्र पुरुष जास्त होते. मी आणि मॅडम मात्र, आधी रमतगमत नंतर कंटाळत आणि त्यानंतर अनिच्छेने प्रत्येक दुकानात शिरत होतो. आमच्या आवडीचे असे तेथे एकही दुकान नव्हते. असो. बाजाराच्या सर्व रस्त्यांवर गर्दीच गर्दी. सुट्टीचा दिवस असो अथवा नसो... रोज इतकी माणसं इतकी कसली खरेदी करतात कोणास ठाऊक. बाजारच्या रस्त्यावर मधील काही क्रॉस रोड्सवर वाहने येत नव्हती. या ठिकाणी आम्हाला पथनाट्य पाहायला मिळाले. मोठे मोठे फलक ते विद्यार्थी पटापट रस्त्यांवर चिकटवत होते.एखादा विद्यार्थी उंच शिडीवर चढून घोषणा देत होता.१० -१० विद्यार्थी नाटक करीत होते, थोडेफार बघे जमले होते. आम्ही दुकानातील अथवा रस्त्यावरील काही लोकांना विचारले कि हे सगळे कशासाठी आहे? परंतु त्यांना आमचा प्रश्नच कळत नव्हता. अखेर आम्ही एका विद्यार्थ्याला विचारले. त्याला थोडे इंग्रजी कळत होते. त्याने सांगितले कि आम्हाला शैक्षणिक धोरणामध्ये बदल हवा आहे. सध्याच्या धोरणामधील काही मुद्दे आम्हाला मान्य नाहीत. इथे ८०% शाळा चीनी माध्यमांच्या आहेत. आम्हाला जास्त शाळा इंग्रजी माध्यमातील हव्या आहेत. ज्यामुळे आम्ही बाहेरील जगात जास्त

आत्मविश्वासाने वावरू शकू. शाळा- महाविद्यालयाच्या फी संबंधात तुम्हाला काही अडचणी आहेत का असे विचारले असता त्याने नाही असे उत्तर दिले. काही विद्यार्थी आमच्या भोवती जमा झाले. नाटक जोशपूर्ण होते, त्यांच्या चीनी- केंतोनी भाषेत आणि टिपेच्या किरट्या आवाजात. बरीचशी माणसे त्यांच्याकडे लक्ष न देता पुढे निघून जात होती...विद्यार्थ्यांना काही फरक पडत नव्हता, त्यांचा उत्साह कायम होता. मला आपल्या कडील मोर्चे, पथनाट्य , पोलीस, घोषणा, याची आठवण झाली. मध्ये एके ठिकाणी थांबून आम्ही वेफर्स घेतले आणि खात खात पुढे सरकलो. अखेर सरांचा रिसर्च त्यादिवसासाठी तरी संपला आणि आम्ही चालतच YWCA ला परत येण्यास सुरुवात केली. भरलेला बाजार, एकसारखी दुकाने, एकसारखी दिसणारी माणसे, समांतर रस्ते, सारखे दिसणारे चौक... ...आणि विचारणार तरी कोणाला... अखेर आम्ही रस्ता चुकलो.. नक्की... लोकांचा YWCA आणि YMCA या मधला प्रचंड गोंधळ.. एक सेन्ट्रल लायब्ररीची खूण आम्ही लक्षात ठेवली होती, पण तीहि कुठे दिसेना... अखेर आमची पायपीट संपली आणि आम्हाला अखेर तो ओळखीचा रस्ता दिसला... रूमवर येऊन मेथीचे ठेपले, खाखरे अशा बरोबर आणलेल्या गोष्टी खाऊन आणि चहा पिऊन झोपलो (चहाचे रेडीमीक्स पण आम्ही फार कष्टाने विकत घेतले होते. कारण सुपर

मार्केट मध्ये आम्हाला काय हवे ते कोणाला कळतच नव्हते, अखेर एका मुलीला काहीतरी कळून तिने आम्हाला ही पाकिटे दाखविली आणि ती पाहून आम्हाला इतका आनंद झाला होता कि बास)...

आज २० जुलै २००७, आम्ही सकाळी ८ वाजल्या पासूनच YWCA सोडले होते. म्हणजे सामान बाहेर काढून हॉटेललाच ठेवून आम्ही पोली. युनि. ला आलो. कारण आज आम्ही दुपारच्या फ्लाईटने बेजिंग ला जाणार होतो. आजचे सकाळचे ९ चे सेशन आम्हाला ऐकायचेच होते कारण त्यामध्ये स्वयंसेवी संस्था, त्यांचे सामाजिक कार्य आणि पर्यावरण रक्षण या विषयावर चर्चा होती.आम्ही इतक्या घाईने आलो खरे पण गम्मत म्हणजे त्या सेशनला फक्त २ लोकांचा सहभाग होता. आमची निराशा झाली. मध्ये चहा, कॉफी, गप्पा, कार्डाची देवाण घेवाण, फोटो काढणे वगेरे सुरु होते...आम्ही पण भारताच्या ग्रुपचा एक फोटो काढला.दोन स्वयंसेवक मुलींशी छान मैत्री झाली होती.एकीचे नाव होते याना. तिला गिफ्ट म्हणून गणपती दिला. मला वाटले घेते की नाही... पण तिने घेतले ते गिफ्ट...खूप फोटो काढले, मेंबरशिपचे पैसे भरले आणि आमच्या हॉगकॉग- बेजींग बुकिंगची चौकशी केली. अर्ध्या तासात सांगते असे ती म्हणाली त्यामुळे आम्ही टाईम पास करत होतो. कॉन्फरन्स चा शेवटचा दिवस असल्याने माहोल एकदम मस्त होता. नवीन ओळखी पुन्हा घट्ट

केल्या जात होत्या. आम्हाला पण काटमांडू चा डॉ. राजू लाइझायीनाचा, डॉ.नाथन आणि इतर सगळयांचा निरोप घ्यायचा होता.

१२ वाजता जॉकी ऑडीटोरीयममध्ये एक लेक्चर होते. ऑडीटोरीयम खूपच मोठे होते. ही जागा तीन मजले खाली होती.चीन ची सामाजिक परिस्थिती, तिथले पर्यावरण या विषयावर वक्त्याने विचार मांडले. भाषण चीनी भाषेत होते परंतु प्रत्येकाला दिलेल्या इयरफोन मध्ये इंग्रजी भाषेत ऐकण्याची सोय होती. जागतिकीकरण, त्याचा चीनमधील खेड्यांवर झालेला परिणाम, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन आणि त्यामुळे उद्भवलेली स्थिती...भारतातील परिस्थितीशी जुळणाऱ्या गोष्टी... शेती सोडून, लहान खेड्यातून माणसं शहराकडे निघाली आहेत असेच चित्र...त्यावर उपाय काय या विषयीचा उहापोह... असो...आता आम्हाला येथून निघायचे वेध लागले होते. आमचा पिकअप YWCA पासून दुपारी २:०० वाजता...आम्ही साधारण १ च्या सुमारास युनि. ची जागा सोडली आणि YWCA ला आलो. रूम सकाळीच सोडली होती. सामान बांधूनच निघालो होतो सकाळी...बरोबर २:०० वाजता कोच आला आणि आम्ही ३:१५ च्या सुमारास एयरपोर्टला पोचलो. एयरपोर्ट सुंदर आहे, ड्युटी फ्री दुकानाच्या रांगा, स्वच्छता, नीटनेटकेपणा..आणि गम्मत

म्हणजे माणसांची गर्दी कितीही असली तरी त्यात फरक नाही होत... चीनच्या टूर ऑपरेटरशी फोन वर सरांचे बोलणे सुरूच होते. सकाळी भरपूर खाल्ले होते त्यामुळे अजून तरी फारशी भूक नव्हती. मी.विक्टरशी (टूरवाला) बोलण्यासाठी आम्ही एक सीमकार्ड विकत घेतले. ते माझ्या फोन मध्ये घातले...या सगळयामध्ये तिथल्या चीनी मुलाने खूप मदत केली. तो जणू आमचा दुभाष्या झाला होता. आमची २ तासांची फ्लाईट होती. खाण वगेरे ठीक होतं. बेजिंगला पोचल्यावर एयरपोर्टवरच सर्वात प्रथम जाणवलेली गोष्ट म्हणजे तिथले हवेतील प्रदूषण.शिडीने विमानातून खाली आलो...आकाशाकडे पाहिले तर निळे आकाश नाहीच, सगळे धुरकट...कोचने एयर पोर्ट बिल्डींग मध्ये आलो आणि पाहिले तर सगळ्या काऊटर समोर लांबच लांब रांगा... आम्ही इमिग्रेशनच्या रांगेत उभे राहिलो. १ तास उभं राहिल्यावर आमचा नंबर लागला. एकूणच होंगकोंग आणि बेजिंगच्या वातावरणात खूपच फरक होता. बरेचसे चीनीच होते, टूरीस्ट फार कमी होते. सगळे सोपस्कार उरकून बाहेर पडेपर्यंत १० वाजले होते. आमच्याकडील फोनचा खूप फायदा झाला. आम्हाला नेण्यासाठी ‘चू’ नावाची मुलगी(टूरीस्ट कंपनी कडून आलेली). आम्ही कोचमध्ये बसून आमच्या हॉटेलवर आलो. हॉटेलचे नाव होते ‘हार्मोनी’.

होंगकोंगमध्ये एक गोष्ट नक्की जाणवली ती म्हणजे माणसं... माणसं जे बोलतात ते करतात. बस ठरलेल्या वेळेत येणार, फोनवर बुकिंग होणार, फोनवर माहिती मिळणार, तिकीट घेऊन कोणीतरी येणार म्हणजे येणार... . सगळ्या गोष्टी सहज, आनंदाने, आणि शिस्तीत सुरु होत्या. मला वाटतं हे होण्यासाठी त्या मनात उतराव्या लागतात हेच खरे...ती मानसिकता तयार व्हायला हवी..त्या बरोबरच देशासाठीचा अभिमान सतत तुमच्या बरोबर असायला हवा. त्या भारलेपणाने आपल्याकडेपण काम झाली तर किती चांगले होईल..’.चू’ ने ‘टीना’ नावाच्या टूर कंपनीच्या बाईला आमच्या हॉटेलमध्ये बोलावले होते, आमचा पुढील प्लान ठरविण्यासाठी... चू ही एकमेव इंग्रजी समजणारी आणि बोलणारी गाईड होती तरीही तिचे इंग्रजीचे ज्ञान तसे यथातथाच होते. इथल्या १% लोकांना तरी इंग्रजी येते कि नाही असा प्रश्न पडेल ही परिस्थिती...संवाद साधणे, संपर्क करणे अतिशय अवघड गोष्ट...म्हणजे टी, सूप, टाईम, रोड, हाउस, ओके, गुड, वाटर अशा अगदी नेहमीच्या वापरातील शब्दांचा सुध्धा त्यांना गंध नव्हता.

हॉंगकॉंगमध्ये लोकांना बऱ्यापैकी इंग्रजी कळत होते. जगाशी असलेला संपर्क, आर्थिक प्रगती आणि एकूणच मोकळेपणा यामुळे माणसं जास्त मोकळी आणि आनंदी वाटली. मदत करायला तत्पर आणि

जगाभिमुख...ते फ्री पोर्ट असल्यामुळे त्यांच्यात ती वृत्ती आणि व्यावसायिकता आली असावी.या उलट चीन मध्ये पाउल ठेवल्यापासून जाणवतो तो वृत्तीतील फरक.. येथील माणसांमध्ये उत्स्फूर्त पणा ऐवजी एकप्रकारचा हेकटपणा, अडेलपणा, जाणवतो. हॉटेल मात्र चांगले होते. लाउंजमध्येच टीनाबरोबर मिटिंग सुरु होती. आमच्या उद्याच्या साईटसीइंग, टूरसाठीचे पैसे या विषयीचा काथ्याकुट सुरु होता... त्यात पुन्हा भाषेची अडचण होतीच... मीन नव्हे मॅडमने आणलेल्या ठेपल्यांमुळे कितीही उशीर झाला तरी आमची भुकेची सोय कायमच झालेली होती..१२ वाजत आले होते...अखेर तिचे आणि सरांचे एकमत झाले आणि आम्ही आपापल्या खोलीमध्ये झोपायला गेलो. या ट्रीपच्या निमित्ताने मी एलेक्ट्रोनीकली कार्ड घालून रूमचे दर उघडायला शिकले.

२१ जुलै २००७- सकाळी हॉटेलमध्ये ब्रेकफास्ट घेऊन आम्ही ८:३० वाजता तयार झालो. हॉटेल चांगले होते आणि ब्रेकफास्ट एकदम एक नंबर. टोस्ट, ओम्लेट, ज्युस, हेंम, अंडी, बेकन, सिरियल्स, चहा, कॉफी आणि बरेच काही...आमची सो कॉल्ड इंग्रजी बोलणारी गाईड ‘चू ‘ वेळेवर हजर होती. आमची होंडा गाडी होती. खरं म्हणजे चू ला बरेचसे इंग्रजी शब्द गेलेच नव्हते. असेल २४-२५ वर्षाची...पैसे मिळवण्यासाठी ही

नोकरी. बेजिंग मध्ये ती एकटीच राहत होती. कालसुद्धा मिटिंग नंतर इतक्या रात्री एकटीच गेली, लांब राहत होती ती हॉटेलपासून... घरी गेली आणि सकाळी पुन्हा हजर...आपल्या इथल्या सारखेच अनेक तरुण/तरुणी.. खेडेगावातून माणसांचा लोंढा कामाच्या शोधात मोठ्या शहराकडे वळतोय. तिचे आई-वडील बेजिंग जवळच्या एका खेड्यात राहत होते. थोडीफार शेती होती ती करत होते. तिच्या म्हणण्याप्रमाणे तिने इंग्रजीत पदवी मिळविली होती अर्थात असे अजिबात वाटत नव्हते. असो.

येथील रस्त्यावर टॅक्सीज विविध रंगाच्या दिसत होत्या. एक मधला पिवळा रंग सोडला तर वरचा आणि खालील रंग वेगवेगळा. चू च्या म्हणण्यानुसार कंपनी बदलली आणि प्रांत बदलला कि रंग बदलतो. बेजिंग मध्ये पाउल ठेवल्यापासून निळे आकाश दिसलेच नव्हते. वातावरण ढगाळ होते आणि त्यामुळेच हवेतील प्रदूषण जाणवत होते.प्रत्येक रस्त्याच्या बाजूने सायकल अथवा दुचाकी वाहनासाठी वेगळी लेन...येथे सायकली खूप दिसत होत्या ही गोष्ट चांगली वाटली. परंतु वाहनाची कोंडी नव्हती, आणि तसे आम्ही ऑफिस वेळेच्या जरा आधीच निघालो होतो आणि शिवाय रविवार होता. ट्राफिक कमी असला तरी प्रत्येक पर्यटन

स्थळी गर्दी होती.शाळांना सुट्ट्या होत्या आणि फोर्बिडन सिटी सारख्या ठिकाणी तर लोकांनी भक्तिभावाने केलेली गर्दी होती. टुरीस्ट मात्र कमी होते.

आम्ही फोर्बिडनसिटीला पोचलो. कडेकोट बंदोबस्तात असलेली ही जागा म्हणजे मिंग राजवंशातील मंडळींचे राहण्याचे – प्रार्थनेचे – झोपण्याचे ठिकाण. १४ व्या शतकातील जगप्रसिध्द राजवाडा. या सिटीला दोन दरवाजे आहेत.काल हॉटेलकडे जातांना आम्ही याच्याकडे एक दृष्टीक्षेप टाकला होता. त्यावेळी बेजिंग स्टेशनसुद्धा पाहिले होते बाहेरून. बेजिंग मधला ‘शी जेंगन शी’ हा मोठा रस्ता होता. आज दिवसा स्टेशन पाहायला मिळाले. या फोर्बिडनसिटीचा एक दरवाजा म्हणजे ‘ तीनानआमेन गेट’ या गेट मधून आम्ही बाहेर पडलो. समोर होता ‘तिनानआमेन स्क्वेयर’. आम्ही प्रवेश केला ते होते दक्षिण गेट. ही दोन्ही प्रवेश द्वारे म्हणजे पाणी आणि अग्नीचे प्रतिक मानतात.

民共和国万岁
世界人民大团
请勿入内

फोर्बिडन सिटी

चीनमध्ये लोकांना प्रत्येक गोष्टीचे प्रतिक करण्याची खोड आहे. त्यांची त्यांच्या राजांवरची श्रद्धा अगदी अढळ आहे. त्यांचे माओवर देखील तितकेच नितांत प्रेम आहे, आदर आहे, भक्ती आहे. त्यांच्या संबंधात एकही उणा शब्द ऐकून घेण्याची त्यांची तयारी नसते. चीन मध्ये दिशांना सुध्धा खूप महत्व दिलं जातं. फोर्बिडन सिटी हा राजवाडा दक्षिणोत्तर बांधलेला आहे. त्यात वेगवेगळी मोठी दालन आहेत लाल आणि पिवळ्या रंगाने रंगवलेली. हॉल ऑफ पीस, हॉल ऑफ लोन्जीविटी, हॉल ऑफ वाटर, हॉल ऑफ फायर वगैरे... आपण पंचमहाभूत म्हणतो तसेच काहीसे... क्विग आणि मिंग राजवटीतील ही दालन. त्यांची भव्यता पाहून आपण अवाक होतो. साधारण ५०० वर्षे हा राजवाडा चीनचा केंद्रबिंदू होता परंतु सामान्य जनतेला इथे पाउल टाकण्याची मुभा नव्हती. पूर्वी त्याला जुना राजवाडा असे संबोधले जायचे आता त्याला 'पेलेस म्युझियम' असे सरकारी गोंडस असे नाव दिले आहे. इथे २४ सम्राट सलगपणे राहिले असे चू सांगत होती. इथल्या हॉल्सची कलाकुसर तशी फारशी आगळी वेगळी नसली तरी भव्यता मात्र डोळयात भरते. सुट्ट्या असल्यामुळे विद्यार्थ्यांचे लोंढेच्या लोंढे आमच्या विरुध्ध दिशेने येतांना दिसत होते कारण आम्ही प्रवेश उलट दिशेने केला होता. आमच्या दुर्दैवाने आमच्या 'इंग्लिश स्पिकिंग' गाईडला इतिहासाची फारशी जाण नव्हती. इंग्रजीपण यथातथाच. परंतु एकूण चीनी लोक जास्त आक्रमक वाटतात, म्हणजे स्वतःचे म्हणणे ऐकायला

लावणारे आणि स्वतःच्या देशाबद्दल जाज्ज्वल्य वगैरे अभिमान बाळगणारे. सभोवतालच्या बदलणाऱ्या परिस्थितीची फारशी जाण नसलेले अथवा पर्वा नसलेले. महालाची अनेकविध दालन पार करत आम्ही उत्तरद्वारापर्यंत पोचलो. हे गेट आणि तीनानआमेन स्क्वेयर या मध्ये शिचीगान हा मोठा रस्ता. गेटने बाहेर पडण्यापूर्वी ५ संगमरवरी पूल आहेत. मधील भव्य पुलावरून म्हणे सम्राट जात असे, बाजूच्या दोन पुलावरून राजाचे कुटुंबीय आणि अगदी पलीकडील २ पूल दरबारी लोकांसाठी. आम्ही आत्ता मधल्या पुलावरून एखाद्या सम्राटासारखे बाहेर पडलो. सर्वात उंच कमानीवर माओचे भव्य चित्र. सगळीकडेच माओचे हेच चित्र, एकमेव... चित्राच्या दिनही बाजूला चीनी भाषेत लिहिलेल्या घोषणा. ‘ चीनी प्रजासत्ताक राज्य चिरायू होवो” “आंतरराष्ट्रीय संघ शक्ती चिरायू होवो” असा त्यांचा अर्थ. हे आम्हाला नंतर कळल. तेथेच एक मोठा खांब होता. खांबाच्या खालील भागात सिंहाची आकृती तर वर एक पक्षी आकार. दोन तीन तास (फोर्बीडन सिटी मध्ये महत्त्वच्या इमारती दक्षिणोत्तर रेषेवर बांधल्या आहेत. त्यांच्या दोन बाजूंनी इतर इमारतींची सममितीय बांधणी, रचना, कळस,...कडेला वर वळणारी उतरती छप्परवगैरे सारखेच) फिरून पाहिलं हे ५०० वर्षापासूनच विश्व. शरीराने आणि मनाने सुध्धा दमायला झाले होते. अनेक सम्राटांनी आपली आयुष्ये इथे घालवली. अनेक अडचणी, गूढ, कट, खलबतं इथे शिजली असतील आणि ही वास्तू हा सारा प्राचीन वारसा

घेऊन इथे उभी आहे. १९११ साली क्विंग राजवटीतील शेवटचा सम्राट पदाच्च्युत झाला असं इतिहास सांगतो. असो.. उत्तरद्वारातून बाहेर पडले कि समोरच दिसतो तिनानआमेन (चीर शांती) स्क्वेयर. हा चौक आणि उत्तरद्वार यामध्ये आहे बारा पदरी रस्ता. हा चौक म्हणजे जगातील सर्वात मोठी सार्वजनिक जागा. काही वर्षांपूर्वी, १९८९ साली विद्यार्थ्यांनी केलेल्या लोकशाहीसाठीच्या आणि भ्रष्टाचार विरोधातल्या उठावाला त्यांच्यावर रणगाडेघालून विद्यार्थ्यांची कत्तल करून कसे दाबून टाकले होते ती बातमी आठवली. हा उठाव एक महिना आणि दोन आठवडे चालला. ४ जूनला लष्कराने उठावाच्या विरोधात हजारो विद्यार्थ्यांची कत्तल केली. अर्थात जगातील सर्व नेत्यांनी या गोष्टीचा निषेध केला. आज ही वर्तमानपत्रातील तो फोटो आठवतो. ते ऐतिहासिक ठिकाण प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला. हे पाहतांना साधारण २००४-२००५ साली आपल्या डॉक्टरांनी केलेल्या आंदोलनात त्यांना झालेली अमानुष मारहाण सुध्धा आठवली. लोकशाहीत हे घडले तर साम्यवादी चीन मध्ये तीननआमेनची घटना घडली त्यात काय नवल? मुळात या चौकाची निर्मितीच प्रक्षोभातून झाली असेही इतिहास सांगतो.

१९११ साली शेवटचा सम्राट पदच्च्युत झाल्या नंतर त्याच्या निशाण्या नष्ट करण्यासाठी सम्राटाची घरं, वाडे, भिंती पडल्या गेल्या आणि हा प्रचंड मोठा चौक तयार झाला. ५०० वर्षात जेथे कोणासामान्य नागरिकाचे पाउल पडले नव्हते तिथे आता कोणीही जाऊ शकत होता. कम्युनिस्टांचे राज्य आले आणि माओची सत्ता सुरु झाली. १ ऑक्टोबर १९४९, रेडगार्डस ची स्थापना झाली. विद्यार्थ्यांनी दडपशाही विरोधात चौक ताब्यात घेतला आणि पुढील सगळे घडले. तेथे एक स्तंभ उभा आहे. रस्त्याच्या पलीकडून त्या चौकाकडे पाहतांना अनेक भावना उचंबळून आल्या.

माणुसकीला काळिमा फासणाऱ्या कृत्याचा साक्षीदार असा हा चौक...इथे अनेक शहीद शब्दशः चिरशांती घेत आहेत.

परंतु रस्त्याच्या दुतर्फा सायप्रस, पाईन्सच्या रांगा, आणि स्वच्छ परिसर.

तिनानआमेन स्क़ेअर

जवळच्याच प्रसाधनगृहात गेलो. स्वच्छ, उत्तम सोय... मला आपल्याकडील प्रसाधनगृहाची आठवण झाली. ‘सुलभ’च्या बाहेर फक्त पैशांची मागणी करीत बसलेले बिनकामाचे अटेंडंट आठवले. स्वच्छतेशी त्यांचा फारसा संबंध नसतो ...तिथल्या स्वच्छतेची काळजी घेण्याची जवाबदारी नेमकी कोणाची असते या प्रश्नाचे उत्तर मला अजून सापडलेले नाही. असो... त्यानंतर आम्ही एके ठिकाणी जेवण्यासाठी थांबलो. थेट चीनी पद्धतीचे हॉटेल. सजावट थोडी भडकपणाकडे झुकणारी. ड्रॅगन, फिनिक्स यांची रेलचेल...हॉटेलमध्ये शिरतांना दुतर्फा अनेक दुकाने, वस्तू विकायला ठेवल्या होत्या. ही दुकाने तुम्ही जिथे जाल तिथे तुमचा पाठलाग करतात...पर्यटकांना खरेदीसाठीची एकही संधी ते सोडू देत नाहीत. सगळीकडेच ‘मार्केटिंग’ फार आक्रमक वाटले. हॉटेल चांगले होते आणि जेवणही सुंदर होते. आम्ही अर्थात शाकाहारी जेवण घेतले. मका, बटाटे, कंद, पालेभाज्या, हे सर्व उकडून किवा भाजून वर छानसे सिरप घालून आणले होते. त्याबरोबर भात... उकड्या तांदुळाचा... पण तांदूळ चवीला गोड होता.त्याबरोबरच चीप्स, ज्युस... . पोट छान भरले. आमच्या गाईड ने आम्ही आग्रह करून देखील जेवण आमच्याबरोबर घेतले नाही. कदाचित तो ‘सिनोटूर’च्या शिस्तीचा भाग असावा. तिथला एक फोटो काढला. बाहेरच ‘अकयुबा’ म्हणजेच चीनी पोशाख घालून दोन तरुणी उभ्या होत्या. आम्हीही त्या दोघींबरोबर फोटो काढला.

हॉटेल

अक्युबा ड्रेस

बाहेर बऱ्यापैकी उन होते अर्थात आमची गाडी वातानुकुलीत असल्याने उकाडा जाणवत नव्हता. आमची सफर पुढे सुरु झाली. एक बुद्धाचे देऊळ पाहून आम्ही गेलो सिल्क सिटी पहायला. भारतातसुध्धा जेथे जेथे रेशीम किड्यांची पैदास होते तिथे त्या विषायीची माहिती दिली जाते. या उद्योगाला ‘सेरीकल्चर’ असे म्हणतात. रेशीम किडा, त्याच अन्न असलेली तुतीची झाडं, किडे कसे वाढतात, कोश कसा तयार होतो, अन त्या पासून रेशीम कसे बनते हे सगळे पाहून निसर्गाची किमया अगाध आहे याचं नव्याने प्रत्यंतर आले. एका कोशातून एक धागा असे ८-९ कोश एकत्र घेऊन एक मजबूत धागा तयार करतात. कोशाला चार बाजूने विशिष्ठ प्रकारे ओढ दिली कि एक चौकोनी असे कापड तयार होते. असे अनेक चौकोन एकमेकांवर ठेवले आणि सर्व कोपऱ्यातून ओढत राहिले कि छानशी रेशमाची रजई तयार होते. आम्ही ती तयार होतांना प्रत्यक्ष पहिली आणि एक छोटेसे वस्त्रही तयार केले. खूप छान अनुभव होता तो... रेशीमधागा वापरून तयार केलेल्या विविध वस्तू विक्रीला होत्या. वस्तू विकत घेतांना किती घासाघीस करायची याची आम्हाला कल्पना नव्हती त्यामुळे थोडी फसवणूक झाली. नंतर कळले कि इथे मोठ्या बाजारातसुध्धा प्रचंड बार्गेनिंग करावे लागते. बार्गेनिंग किती असावे... ..दुकानदाराने १० युआन किंमत सांगितलीतर आपण २ युआन ही किंमत सांगायची आणि अखेर त्याच किमतीत वस्तू विकत घेता येते. त्यांच्या प्रमाणेच आमच्या भारतातपण विविध प्रकारचे

छान रेशीम तयार होते असे आम्ही सांगूनही त्यावर त्यांचा फारसा विश्वासच बसत नव्हता. आम्ही थोडीफार- किरकोळ खरेदी केली आणि परतीच्या वाटेला लागलो.आजचे साईट सीइंग संपले. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे सगळीकडे, दुकानात, बाजारात बहुदा मुली- बायकाच कामात व्यग्र होत्या. मुले- पुरुष अगदी कमी...चीनी माणसं, पुरुष नेमके कोणते काम करतात हा प्रश्न मला सतत पडत होता. असो... .

आम्ही हॉटेलवर परतलो आणि आमच्या ‘शो’ ची सुरुवत झाली. म्हणजे असं कि आमच्या टूरऑपरेटर बरोबर होणाऱ्या पुढील दिवसाच्या साईट सीइंगच्या चर्चा- बोलणी ज्याला आम्ही गमतीने ‘शो’ असे म्हणत असू. या टूरवाल्या मुली खूपच बिनधास्त आणि आक्रमक वाटल्या. रात्री ११-१२ पर्यंत त्या त्यांच्या कामानिमित्त बाहेर असत. टीना ही त्यांची टूर मेनेजर होती. तिच्याशी खूप काथ्याकुट करावा लागत असे आणि त्याचे मुख्य कारण म्हणजे तिचे इंग्रजीचे अज्ञान. परंतु त्या सर्वच मुली आव असा आणत कि तुम्हालाच कळत नाही मी काय बोलतेय ते... ..मी आणि मीन कधी त्या संभाषणात भाग घेत असू अथवा कधी नुसतेच श्रोते (आणि संभाषण कसले ते, नुसत्याच खाणाखुणा..). आमची बोलणी फिस्कटली त्यामुळे रात्री १० वाजता तिच्या सारखीच आणखी एक टीना येऊन आमचे डीपोझीट परत करून जाणार असे ठरले.

हे सर्व झाल्यावर आम्ही जरा चक्कर टाकायला बाहेर पडलो. आम्हाला १० वाजता परत यायचे होते. बोलणी फिसकटण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या टूर कंपनीने आम्हाला कोणत्याही प्रकारची कागदपत्र दिली नव्हती आणि आम्ही त्यासाठी आग्रही होतो. बेजिंग मधली ही संध्याकाळची चक्कर खास झाली. आम्हाला सीमकार्ड घ्यायचे होते. सगळीकडे भाषेचा मोssssठठा प्रश्न होता. आमचे हॉटेल तसे मोठ्या रस्त्यावर होते. परंतु तिथे माणसं फुटपाथवर वस्तू विकतांना, पथारी टाकून झोपतांना दिसली. लहान टपऱ्यापण होत्या. एक टेबल आणि चार खुर्च्या टाकून माणसं काहीतरी खात होती. ISD/ STD अशा पाट्या नव्हत्या, सायबर केफे नव्हते... अखेर एक टपरी दिसली. त्याच्याकडे रिफील संबंधी विचारले. त्याने आम्हाला कार्ड दाखवले, आम्ही हो म्हणालो, त्याने माझ्या फोन मध्ये ते कार्ड टाकले नंबर मिळाला, मिस्ड कॉल देऊन झाले... आणि तो जास्त पैसे मागायला लागला.. का ते आम्हाला कळेना...आणि तो काय बोलत होता तेही आम्हाला कळेना... आम्ही छापील किमतीवर अडून होतो. कॅल्क्युलेटर वरील आकड्याखेरीज त्याला आणि आम्हाला काहीच कळत नव्हते. कार्ड तर आमच्या फोन मध्ये होते. बघ्यांची गर्दी जमायला लागली. लोकं आमच्याकडे विचित्र नजरेने पाहायला लागली. तेव्हढ्यात एक मुलगी जणू आमच्या मदतीला धावून आली. तिला थोडेफार इंग्रजी येत होते असे आम्हाला वाटले पण ते आम्हाला आणि दुकानदाराला कळेल इतके

नव्हते. अखेर आम्ही फोन मधील कार्ड काढून परत दिले आणि जास्त गर्दी आणि गोंधळ होण्यापूर्वीच तिथून निघालो... १० वाजता ती टूरवाली बाई येणार होती... १० वाजता ती आली. हिचे नावही टीना होते...हे नाव फार लोकप्रिय असावे..ही टीना त्या टीना पेक्षा जास्त समजूतदार होती आणि तिला थोडे जास्त इंग्रजी कळत होते... शेवटी काय टूर कंपनीला पण आमची गरज होतीच कि...अखेर सौदा पटला,,,म्हणजे , पैसे, किती ठिकाणे पहायची, वेळ, परत कुठे सोडणार या पैकी बराचश्या गोष्टींवर एकमत झाले आणि आमचा बेजिंग मधील दुसरा दिवस आम्हाला हवातसा होणार अशी चिन्हे दिसू लागली. उद्याच्या गाडीचा नंबर, गाईड, तिचे नाव या सर्व गोष्टी आम्हाला मिळाल्या. आम्ही खाऊन शांत चित्ताने झोपलो.

२२ जुलै २००७ - सकाळी ८:३० वाजता, मनसोक्त ब्रेकफास्ट करून आम्ही आमची गाईड 'मेन' ची वाट पहात थांबलो होतो. हॉटेल चांगलेच होते. नाव होते 'युझीयू'. इथल्या बहुतेक गाईड्स इंग्रजी नावे घेतात. जगभरातून पर्यटक येतात, त्यामुळे त्यांना ओळखीची, सवयीची, जवळची वाटतील अशी नावे त्या धारण करतात. बदलणाऱ्या परिस्थितीबरोबर बदलणारी माणसं मुळात अडेल नसतात असे वाटते. मेन होती जवळपास तिशीची, लग्न झालेली... नवरा MR होता असे म्हणाली. तशी वागायला जवाबदार, चांगली

होती, इंग्रजी पण बऱ्यापैकी बोलत होती. म्हणजे चू पेक्षा खूपच चांगले...इतिहास पण माहित होता, आपण गाईड आहोत याची सतत जाणीव असलेली... सिनीटूरची व्यवस्था मात्र चांगली होती. छान होंडा ए. सी. गाडी, लंच ची व्यवस्थाही उत्तम, गाईडही चांगली, ठरलेली सर्व ठिकाणं दाखविणार... असा कालचा अनुभव होता. मात्र कोणतेही कागदपत्र देण्याची टाळाटाळ ही वाईट खोड होती... असो... आज आम्ही प्रथम 'टेम्पल ऑफ हेवन' पाहायला निघालो होतो.

मिंग राजवट काळातील हे ठिकाण. मींग आणि क्वींग राजवटीतील राजे चांगले पिक यावे म्हणून प्रार्थना करण्यासाठी येथे येत असत. हे ठिकाण युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे. परिसर खूप मोठा होता. तेथे आहे एक बळी देण्यासाठीचा संगमरवरी चबुतरा. देवाला संतुष्ट करण्यासाठी बोकड, घोडा अशा प्राण्यांचा बळी दिला जात असे. येथील बांधकामात ९ हा आकडा आपल्याला सतत दिसतो. म्हणजे असे कि चबुतऱ्याच्या जिन्याचे जिने ९-९ पाहिऱ्याचे, प्रत्येक जिन्याच्या ९ फरश्या वाढत जातात. इतके जुने बांधकाम असूनही फरश्या आजही सलग आहेत. चबुतऱ्याला छप्पर नाही. त्याच्या मध्यावर उभे राहून काही शब्दोच्चार केल्यास तो परत स्पष्टपणे आपल्याकडेच येतो. त्या मध्यावर उभं राहण्यासाठी लोकांची इतकी गर्दी होती कि आम्ही मध्यापर्यंत पोहोचू शकलो नाही. चबुतऱ्याच्या पुढे आणखी एक देऊळ आहे. त्याच्या भिंतीलगत उभं राहून हळूच बोललं तर काही अंतरावरच भिंतीलगत उभ्या असलेल्या माणसाला ते स्पष्ट ऐकू येतं. हा प्रयोग मात्र आम्ही करून पहिला. आपल्याकडील गोलघुम्मटा प्रमाणेच हा एक कुजबुजता अर्धगोल आहे. त्या परिसरात सगळीकडे अनेक प्रकारची झाडे आहेत. त्यातील एक सायप्रस वृक्ष असा दिसतो जसा अनेक ड्रेगन्स एकत्र आलेत. त्याकडे पाहत राहिले कि ते खरच एकमेकांशी खेळतात कि काय असे वाटते. हे झाड म्हणे ५०० वर्षे जुने आहे अशी माहिती दिली आहे.

九龙柏

त्यानंतर आणखी एक वास्तू पाहीली. एक मोठा हॉल होता. आतमध्ये बरेच लाल रंगाचे खांब होते, काही मोठे, काही लहान. आत जाण्याची परवानगी नव्हती. आतमधील गोष्टी नीट दिसत देखील नव्हत्या. त्यानंतर दीसली मिंग घराण्यातील राजांची थडगी. आजूबाजूला अनेक डोंगर होते. परिसर अतिशय प्रसन्न वाटत होता. एकूण १३ राजांची थडगी या परिसरात आहेत. आसपासच्च्या टेकड्यांना ‘हिल्स ऑफ लोन्जीविटी’ असे म्हणतात. जेथे सम्राटाचे थडगे आहे तो भाग सुंदर आहे. सगळी थडगी पाहून झाले कि एका कमानीवजा दारातून बाहेर पडायचे. कल्पना अशी आहे कि आपण वेगळ्या जगाचा फेरफटका मारून आलेले असतो, त्यामुळे परत माणसांच्या जगात यायचे आणि त्यासाठी त्या कमानीतून बाहेर येतांना प्रत्येकजण ‘ मी परत आलोय’ अशा अर्थाचे ओरडून सांगत होता. आम्ही स्वतःच्या भाषेत ते ओरडून सांगितले. थडग्यामध्ये राजाचे दागिने, कपडे, आणि इतर वस्तूंचे प्रदर्शन आहे. आपल्या कोल्हापूरच्या महाराजांचा राजवाडा आहे तसेच काहीसे. तेथून आम्ही जेड फेंक्टरी पाहायला गेलो. खरे म्हणजे एक मोठे दुकानच होते ते. चीनी लोकांना जेड (हरितमणी) चे फार वेड असावे असे दिसते. पुतळे, भांडी, दागिने वगेरे वस्तू विकायला होत्या.जेड विषयीची माहिति सांगितली जात होती.जेड चे महत्व औषधांमध्ये सुध्धा आहे असेही सांगितले गेले. जेड फक्त हिरवाच असतो असे नाही तर तो अनेक छटांचा असू शकतो. तेथील अनेक

वस्तूंसोबत एक कौटुंबिक सुखाचा चेंडू देखील दाखविला जाई. त्याला बॉल ऑफ हपिनेस असे म्हणत. एकात एक घातलेले सात चेंडू आणि कौटुंबिक सौख्य याचं काय संबंध हे मला आजही कळलेले नाही. असो. खूप गोष्टी होत्या, चांगल्याही होत्या आणि महागही होत्या... आम्ही सोडून फारसे गिऱ्हाईक नव्हतेच... खरा जेड आणि बनावट जेड यातील फरक कसा ओळखायचा हे सुध्धा त्यांनी दाखविले. काचेवर ओरखडा काढेल तो खरा जेड. या दुकानात पण सगळ्या मुलीच होत्या. एव्हाना आम्हाला बार्गेनिंगचे तंत्र सगळीकडेच लागू होते हे समजले होते. मानेवरून, डोक्यावरून फिरविण्यासाठी जेड चे एक यंत्र आम्हाला घ्यायचे होते परंतु किमतीमध्ये फिसकटल. एरवी सगळ्या मुली गिर्हाईक नसल्यामुळे नुसत्या गप्पा मारीत बसलेल्या होत्या. आम्ही अगदी किरकोळ खरेदी केली आणि बाहेर पडलो. आता आमची गाडी निघाली चीनची जगप्रसिध्ध भिंत पाहायला. आणखी एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे बऱ्याचशा लोकांकडे बाटलीत हर्बल चहा भरलेला असतो आणि ते सतत तो पीत असतात. साध पाणी पितच नाहीत कि काय कोणास ठाऊक. आम्ही मेनला (आमची आजची गाईड) टिकली दिली होती. तिने ती लावूनपण घेतली. छान दिसत होती, म्हणाली घरी जाईपर्यंत तशीच ठेवीन.

चीनची भिंत आम्ही ‘बदालिंग’ या ठिकाणाहून पाहिली. इतके दिवस नुसती ऐकलेली, पुस्तकात, चित्रात पाहिलेली, जगातील एक आश्चर्य ठरलेली भिंत प्रत्यक्ष पाहायला मिळणर या विचारानेच आम्ही खूप उत्साहात होतो. चीनच्या सर्व कागदपत्रांवर असलेली ही चीनची निशाणी आज आम्ही प्रत्यक्ष पाहणार होतो इतकच नव्हे तर आम्हाला त्यावरून चालण्याची संधी मिळणार होती. आसपास डोंगर, झाडी आणि अगदी चढायला सुरुवात करेपर्यंत विविध वस्तू विकणाऱ्या दुकानांची असलेली साथ. गाडीतून उतरता उतरताच कर्णकर्कश असा सिकाडा या कीटकांचा आवाज. आवाज इतका कर्कश्य पण कीटक दिसत मात्र नाही.

चीनची ही भिंत साधारण २३०० वर्ष जुनी आहे. असे म्हणतात कि ही भिंत बांधतांना ४ लाख माणसांचा मृत्यू झाला आणि त्यातील अनेकांना तेथेच दफन करण्यात आले असा समज आहे. कित्येक वर्षे अनेक राजवटी आणि राजांनी ही भिंत बांधण्याचे काम हाती घेतले होते. सर्व राजवटींनी खर्च केलेला भिंत बांधण्यासाठीचा काळ एकत्र केला तर तो २०-२२ शतकं इतका होईल आणि सर्व भिंतींची लांबी एकत्र केली तर ती १२,००० कि मी इतकी होईल..अगदी अलीकडील मिंग राजवटीने साधारण ६००० कि मी भिंत बांधण्यासाठी २५० वर्ष खर्च केली. चीनवर राज्य करणाऱ्या प्रत्येक राजाने उत्तरेकडून होणाऱ्या परकीय स्वाऱ्या रोखण्यासाठी मुळात ही भिंत बांधली. या भिंतीला जवळ जवळ २५,००० बुरुज आहेत. असे नमूद आहे कि १९६६ साली झालेल्या सांस्कृतिक क्रांतीच्यावेळी या भिंतीची खूप नासधूस झाली. लोकांनी चिरे उखडून नेले परंतु त्यानंतर, माओच्या मृत्युनंतर पुरातत्व खात्याने या भिंतीला पुनरुज्जीवित केलं. ही भिंत पर्वतांवरून जात असल्याने सुरुवातीचा काही भाग सपाट असला तरी नंतर बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. पायऱ्या उंच उंच आहेत. भिंत रुंद आणि मजबूत आहे. दोन्ही बाजूंना रेलिंग आहे. आजूबाजूला सायप्रस वृक्ष आणि सिकाडाचा कर्कश्य गजर. पायऱ्या उंच असल्याने दमछाक होत होती. आम्ही दीड बुरूजाइतकी उंची गाठली. बुरूजा वरून दिसणारं दृश्य कधीच विसरता येणार नाही. मुख्य म्हणजे ही भिंत

किती प्रचंड आहे याचा अंदाज उंचीवरून येतो आणि चकित व्हायला होतं. इसवीसनपूर्व चार शतकं या भिंतीच्या बांधकामाला सुरुवात झाली असे म्हणतात..

भिंत चढायला सुरुवात करण्याच्या जागी एक संगमरवरी उंच असा दगड आहे त्यावर चीनी भाषेत काहीतरी लिहिलं आहे. सर्वजण त्या दगडासमोर उभे राहून फोटो काढून घेत होती. आम्ही सुध्धा फोटो काढला. आणि काय लिहिले आहे हे विचारण्यासाठी योग्य माणसाच्या शोधात होतो. आमच्या गाईडला विचरले ...खूप प्रयासानंतर आम्हाला कळले कि त्या दगडावर लिहिले आहे ‘ I have made it’... ...मी हे केलंय, मी ही भिंत चढलोय... अशा अर्थाने... आमची आजची गाईड तशी बऱ्यापैकी इंग्रजी बोलत होती...तिला भाषा समजतही होती. तिच्याशी थोड्याफार गप्पा होऊ शकल्या. इतर चीनी लोकांप्रमाणे तिला सुध्धा आपल्या देशाचा प्रचंड अभिमान होता, आणि नवीन समजून घेण्याची इच्छा सुध्धा होती. तिच्या म्हणण्याप्रमाणे नवरा- बायको आणि एकच मुल – असे असते इथले कुटुंब. राजेशाही, राजा, राजधराणे या गोष्टींचा इतका पगडा आहे प्रजेवर कि कुटुंबातील त्या एकुलत्या मुलाला ‘लिटल एम्परर’ असे संबोधले जाते. कुटुंब एकसंध राहिले पाहिजे असे तिचे मत. परंतु अलीकडे घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे असेहि ती म्हणाली. एक बुरुज पार करून वर चढतांना खरोखरीच दमायला झाले. एके ठिकाणी आम्ही तिथून परत मागे फिरण्याचा निर्णय घेतला आणि पायऱ्या उतरू लागलो. अनेक लहान मुलं, वयस्क माणसं, कडेवर मुल असलेल्या स्त्रिया, अशी अनेक वयोगटातील माणसं भिंत चढत होती. प्रत्येकासाठीच भिंत चढणे, भिंतीवरून

चालणे हे अविस्मरणीय असेच होते. देश विदेशातील पर्यटक तुरळक असले तरी गर्दी चीनी लोकांचीच होती. आम्ही उतरून खाली आलो. सगळीकडे दुकानांची गर्दी, प्रचंड बार्गेनिंग आणि चीनी लोकांचीच झुंबड...थोडीफार छोटी खरेदी करून आम्ही गाडीत येऊन बसलो. भूक सपाटून लागली होती आणि आम्ही आमच्या टूरवाल्याने ठरविलेल्या हॉटेलकडे निघालो. शाकाहारी जेवण म्हणजे अनेक भाज्या, कॉर्न, मशरुम्स, बटाटा चीप्स, आणि या सगळयावर सिरप, उकड्या तांदुळाचा भात, आणि बरोबर ‘चा’ , थंडपेय... . सूप म्हणजे काय? आणि ते त्यांच्याकडे मिळते का? हे मात्र आम्ही त्यांना शेवटपर्यंत विचारू शकलो नाही.. इतकी वाईट परिस्थिती संवाद साधण्याची...भूक लागलीच होती त्यामुळे जे समोर आले त्यावर ताव मारला. जेवणानंतर आम्हाला ‘ क्लोईझोन’ म्हणजे विविध धातू, काच याची भांडी, ज्यावर सुंदर कलाकुसर केलेली असे, बनणाऱ्या कारखान्याला भेट द्यायची होती. बेजिंग मध्ये या कलेची सुरुवात युआन राजाच्या काळात झाली. त्या वेळेपासून चीनमध्ये युआन हे चलन चालते. मींग राजवटीत सुध्धा ही कला दिसून येते. त्यावेळी केवळ राजघराण्यातच क्लोईझोनचा वापर होत असावा.उच्चभृपणाचे लक्षण जणू. नंतर मात्र ही कला जगभर पसरलेली दिसून येते. आत शिरल्या शिरल्या आम्हाला एक कस्टमर सर्विस कार्ड दिले. या जागेचे नाव होते चांगपिंग... तांब्याच्या भांड्यांचे, इतर वस्तुंचे ढीग होते.

कामात व्यस्त असलेले कलाकार

इथे पण कामाला सगळ्या मुलीच... स्वतःच्या कामात मग्न. तांब्याची बारीक तार करून ती हर्बल ग्लूने विविध डिझाईनमध्ये भांड्यांवर चिकटवायचे अतिशय नाजूक असे काम होते ते. त्या डिझाईनमध्ये मग हर्बल रंग भरले जात. तो रंग डिझाईनभर एकसारखा पसरावा यासाठी मग ही भांडी भट्टीत घातली जात. भट्टीतून बहर काढून पुन्हा रंग नीट करायचा असे साधारण ६-७ वेळा चाले. यामुळे तांब्याच्या तारेची उंची आणि रंग हे एकजीव होत असत. अतिशय सुंदर, नाजूक फुलदाण्या, बांगड्या, माळ, भांडी, अशा अनेक सुबक वस्तू आम्हाला पाहायला मिळाल्या. आम्ही थोडीफार खरेदी केली आणि बाहेर पडलो. आता आजच्या दिवसातील शेवटचे ठिकाण होते ‘ चायनीज मेडिसिन आणि रिसर्च सेंटर’. बिल्डींग चांगली होती. खास पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक गोष्टी केल्या होत्या. आम्हाला एका खोलीत बसायला सांगितले. आणि मग एका डॉक्टरने(?) आमचा ताबा घेतला. मला भोंदूबाबाकडे आलो आहोत असे वाटले. शरीरातील अगदी सामान्य आणि जुजबी गोष्टी एका चार्टद्वारे सांगितल्या. म्हणजे तुमचे लिवर, हार्ट, किडनी कुठे आहेत वगैरे..मनातल्या मनात मला हसू येत होते. तुम्ही या वयात कशी आणि कोणती काळजी घ्यायला पाहिजे वगैरे सांगितले आणि काही औषधे आणि त्यांच्या भरमसाठ किमतीही सांगितल्या... सगळे जनरल ...

कोणीही सांगू शकेल असे... हे सगळे बोगसपणाकडे झुकणारे... राग येणारे... मी कसाबसा राग आवरला. जुजबी गोड बोलून, आम्हाला औषधे नकोत असे सांगून आम्ही अक्षरशः तिथून सटकलो.

आमची शांघाईची फ्लाईट संध्याकाळची होती. 'मेन' (आमची गाईड) ने आम्हाला बेजिंग एयरपोर्टला चेक इन पर्यंत सोडायचे असे ठरले होते. आम्ही जेव्हा बेजिंगला आलो तेव्हा अंधार झाला होता, आणि आम्हाला एयरपोर्ट नीट बघता आला नव्हता. आत्ता आम्हाला तो चांगल्या प्रकारे पाहता आला. आम्ही काही युआन मोजून तिथेच कॉफी प्यायलो. मेन ने आम्हाला चेक इन केले (कारण आमच्या कडे काहीच पेपर्स नव्हते) आणि ती गेली. तिला आम्ही एक सिल्कचा स्कार्फ भेट म्हणून दिला.. फ्लाईट येईपर्यंत निवांत गप्पा मारल्या..आता शांघाईला फोन लावण्याचे प्रयत्न सुरु केले. आमच्या साठी मेनला २ तास थांबावे लागले होते. रविवार होता. तिचा नवरा घरी होता, परंतु आमचा आणि तिचाही नाईलाज होता. चीन मधील तरुण- तरुणी, त्यांचे लग्नाबद्दलचे विचार, पिढ्यांच्या विचारातील अंतर, अशा अनेक विषयांवर आम्ही बोललो. तिने सकाळी लावलेली टिकली नवऱ्याला दाखवून मगच काढणार असे म्हणाली. तिच्या म्हणण्या प्रमाणे हल्ली मुली फार आक्रमक आणि हक्काने मागणी करणाऱ्या झाल्या आहेत. परंतु नोकरी निमित्त लहान

गावातून बेजिंग मध्ये येतात आणि हरवून जातात... कुटुंबापासून लांब राहतात, लहान जागेमध्ये राहतात, आणि मिळेल ते काम करतात. बेजिंग मध्ये जागांचे भाव आकाशाला भिडलेले त्यामुळे नोकरी, पैसा, तो घरी पाठवणे, जास्त पैशासाठी जास्त काम करण्याची त्यांची तयारी असते. खूप विचार करणारी होती मेन...ती गेल्यावर आम्ही अखेर ठरलेल्या गेटपाशी येऊन बसलो. बेजिंग ला बाय - बाय केले. शांघाई पर्यंतचा दोन - अडीच तासांचा प्रवास...प्रवास बरा झाला. देशांतर्गत प्रवास थोडासा वेगळा वाटला. आम्ही शांघाईला पोचण्यास उत्सुक होतो. २२ जुलैला रात्री ८:३० – ९:०० च्या सुमारास आम्ही पोचलो. इमिग्रेशनची भानगड नव्हती. आमचे फोन लावण्याचे प्रयत्न सफल झाले आणि सिनोटुर्सने गाईड पाठविण्याची व्यवस्था केली होती. आम्ही १० मिनिटात बाहेर पडलो तर आमच्या नावाचा फलक घेऊन ‘पौला’ उभीच होती. नकटी, गोरी, मोठा चष्मा, शोर्ट आणि टी शर्ट घातलेली पौंला प्रथमदर्शनी फारशी संवेदनशील वाटली नाही. असो...होंडा गाडीतून आम्ही आमच्या तारांकीत हॉटेलकडे निघालो. आम्ही आमच्या खोल्यांचा ताबा घेतला आणि उद्याची वेळ ठरवून पौलाने आमचा निरोप घेतला. विमानात खाणे तसे झाले होते पण तरीही थोडे खाऊन आणि चहा कॉफी घेऊन आम्ही झोपेच्या आधीन झालो. शांघायचा एयरपोर्ट सुंदर आणि

झगमगीत होता. आमच्या हॉटेल चे नाव होते ‘गंग हॉग’. इंटरनेटची सोय असलेले मस्त होते हॉटेल... झोप पण मस्त लागली. आम्ही होतो २५ व्या मजल्यावर... . तिथून दिसणारे शांघाई पाहायला छान वाटत होते.

सकाळी सगळे उरकून आम्ही ब्रेकफास्ट करण्यासाठी डायनिंग एरियात गेलो. २३ जुलै २००७ ... .सकाळी साडे आठची वेळ दिली होती गाईडला. ब्रेकफास्ट अगदी चारीठाव होता...पोट भरून लाउंजमध्ये येऊन बसलो. शांघायची शान वेगळी होती. शांघायचा अर्थ “sail together”. सगळे कसे जागच्या जागी होते. आज आम्ही ‘व्हू झान’ या ठिकाणी जाणार होतो. साधारण २ तासांचा प्रवास होता. आमची गाडी, आम्ही आणि पौला. गाडीतून रस्त्याकडे पाहतांना सारखे मनात येत होते, आपली मुंबई होऊ शकेल का कधी शांघाय? इतकी स्वच्छ, आखीव आणि नेटकी? विचार मनात येता येताच नाहीसा झाला.आपले शासक, इथले शासन, शोसिक प्रजा, रोज मुंबईकडे येणारे माणसांचे लोंढे, वैविध्यपूर्ण माणसं, आपली लोकशाही, आणि राजकीय इच्छाशक्ती अशा अनेक गोष्टी. गेल्या २५-३० वर्षात शांघायचा झालेला कायापालट हा एक वस्तुपाठच म्हणावा लागेल. अखेर मुंबईला शांघाय सारखे पाहण्याचा नाद मी सोडून दिला.जस जसे आम्ही शहराच्या गजबजाटापासून लांब जात होतो तस तसे घरांची उंची कमी कमी होत

होती. हायवेच्या दोन्ही बाजूस २-३ माजली इमारती, प्रत्येक इमारतीवर सोलर पॅनेल्स... प्रवास अगदी सुखकर... २ तासांच्या प्रवासात ६ वेळा टोल भरला. सुविधा हवी तर त्याची किंमतही मोजायलाच हवी ना?

अखेर आम्ही व्हू झान ला पोचलो. व्हू झान येथे चीन मधील एखादे काही शतकापूर्वीचे गाव कसे असेल ते दाखवले आहे. हे गावाचे प्रदर्शन २००० साली लोकांसाठी खुलं झालं. गावात विविध प्रकारची काम कशी होत होती, त्यावेळची घरं,लोकं, त्यांचे लग्न समारंभ, उद्योगधंदे, पिकं, लायब्ररी, डीस्टीलरी, हातमाग, शाळा, आणि असेच बरेच काही. इथे सुध्धा पर्यटकांपेक्षा स्थानिक लोकांची गर्दी जास्त दिसत होती. आमचे दिसणे, आमचे कपडे, साडी, ड्रेस वगेरे त्यांच्या साठी नवीनच होते. काहींनी आमच्या बरोबर फोटोही काढून घेतले. उन मात्र खूप होते. आम्ही पण ३ तास

फिरून दमलो होतो.शाकाहारी जेवण घेण्यासाठी आमच्या टूर कंपनीने ठरवलेल्या हॉटेलमध्ये गेलो.

乌镇游客服务中心
WUZHEN VISITOR CENTER

पुन्हा तेच..शाकाहारी जेवण म्हणजे सिरप मधील भाज्या, मक्याचे दाणे, बटाट्याचे काप, त्यांचा हर्बल चहा, आणि जाड उकडा तांदुळाचा भात... तांदूळ गोड होता...पोट छान भरले. जेवण उरकून आम्ही लेदर मार्केट मध्ये गेलो. ५-६ मजली प्रचंड असे हे मार्केट फक्त लेदरचे होते. बेग्स, पाकीट, पर्सेस, पट्टे, जेकेटस, चपला, बूट, असे बरेच काही...ही जागा लेदर, लाकडाच्या फेकटरी, आणि लीकर्स यासाठी प्रसिध्ध आहे. इथेपण आम्ही थोडी खरेदी केली आणि दोन तास परतीचा प्रवास करून आम्ही हॉटेलवर परतलो. आज त्या मानाने आम्ही लवकर परतलो होत. पौंला ने क्रुझ वर जाणार का असे विचारले अर्थात त्याचा चार्ज वेगळा. आम्ही क्रुझवर जायचे ठरविले. रात्रीच्या वेळी शांघाय खुप छान दिसतं. पैशाचा झगमगाट, वरून दिसणारी सुबत्ता, आणि सौंदर्य हे सगळं एकत्र पाहायचं म्हणजे क्रुझची सफर तर करायलाच हवी. आम्ही तासाभरात तयार राहावे असे ठरले. पौंला पुन्हा ७ वाजता हजार झाली. आम्ही निघालो. क्रुझसाठीचं तिकीट काढण्यासाठी आम्हाला एके ठिकाणी रांगेत उभे करून ती नाहीशी झाली. हा यांगत्से नदीवरील क्रुझ. खूप गर्दी होती, पण बरीचशी स्थानिक लोक. पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे टूरिस्ट तसे कमीच. तिकीट घेऊन आम्ही क्रुझ वर पोचलो. बोट छान होती. जिना चढून आम्ही पहिल्या मजल्यावर गेलो.

शांघाय

डोळयांचं पारणं फिटलं... चमचमती मायानगरी शांघाय. उंच इमारती आणि सर्वात सुंदर दिसणारा टी.व्ही टॉवर- शांघाय येथील एक आकर्षण. एक शेलाटी बांध्याची इमारत. वर एक गोलाकार आणि पुन्हा

निमुळत होत जाणार टोक. शांघायची सीग्नेचर... .जणू काही हिरेजडीत वास्तू. त्याच्या जवळच शांग्रीला हे हॉटेल. अनेक मोठ्या कंपन्यांच्या इमारती.

टी.व्ही. टॉवर वरून पण शांघाय बघण्याची सोय आहे. आम्ही मात्र क्रुझ वरूनच शांघायचंहे रात्रीचं रूप डोळ्यात साठवलं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष्य बील क्लिंटन म्हणे या शांग्रीला हॉटेलमध्ये राहिले होते. ५० मिनिटाचा क्रुझ होता. अतिशय सुंदर असे दृश्य... कायम स्मरणात राहील. आम्ही क्रुझ संपवून रात्री ९ ला हॉटेल वर परतलो. आजच्या संपूर्ण दिवसाच्या प्रवासात आमची पौंलाशी चांगली ओळख झाली होती. तिने आम्हाला चीनी भाषेतील काही जुजबी शब्द शिकवले, जसे 'श्ये श्ये' म्हणजे आभार... आणि 'नी हाव'म्हणजे हलो... आणखीहि काही शब्द... डायरीत लिहून घेतले सगळे.. शब्दांची उजळणी करत आम्ही हॉटेलवर पोचलो. थोडे जेवलो आणि फ्रुट डीश खावून आम्ही झोपलो. दुसऱ्या दिवशी जरा उशिरा निघायचे होते...२५ व्या मजल्यावरील त्या छानशा थंडगार खोलीत कधी झोप लागली ते कळलेच नाही. सकाळी बरोबर ९ वाजता ब्रेकफास्ट उरकून आम्ही पौंलाची वाट पाहत थांबलो होतो.

आज २४ जुलै २००७. गाडी घेऊन पौंला वेळेवर आली. आज आम्हाला ‘हॉग झोऊ’ मधील ‘लिंग यीन’ हे देऊळ पाहायला जायचे होते. हा भाग पूर्व चीन उपसागराचा आहे आणि त्याला ‘चीनचा स्वर्ग’ असे म्हणतात. सर्व बाजूंनी पर्वतराजींनी वेढलेले हे ठिकाण. वेस्ट लेक हा एक क्वियंगटंग नदीच्या पाण्यामुळे तयार झालेला गोड्यापाण्याचा तलाव आहे, या मध्ये असंख्य मंदिरे, पागोडा, कृत्रिम बेटे आणि बागा आहेत. ही युनेस्कोने जाहीर केलेली जागतिक वारसा स्थळ आहे. अतिशय रम्य, सुन्दर असे लेन्डस्केप, एक छान विकसित केलेले पर्यटन स्थळ. पावलोपावली पर्यटकांसाठी दुकाने असूनही सगळीकडे स्वच्छता, सहज सापडणारी आणि स्वच्छ अशी प्रसाधनगृहे.

आधी म्हटल्याप्रमाणे शांघायपासून हायवे ने बाहेर पडले कि छोटी २-३ माजली घरे दिसू लागतात. घरांवरील कौलांवर वाटर प्रूफिंगसाठी वापरलेल्या इपॉकसी मुळे चकाकणारी छत. होंग झो हे ठिकाण पर्यटकांसाठी खास विकसित केले आहे. या मोठ्या तलावामध्ये दोन हिरवीगार बेट आहेत. तेथे एक बुद्धाचे देऊळ आहे, एक तुटका पूल आहे आणि त्याच्याशी निगडीत प्रचलित एक कथा. १९९७ साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष क्लिंटन या ठिकाणी आले होते. येथील ड्रॅगन टी, वाईन आणि लेदर प्रसिध्द आहे. तळयाचं सुन्दर रूप बोटीवरून मनात साठवतांना मीना प्रभू यांच्या पुस्तकात वाचलेली माहिती आठवली. असो. तळं अतिशय सुंदर आहे. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती ही कि प्रत्येक गाईड नव्हे प्रत्येक व्यक्ती आपल्या देशाचा जाज्वल्य अभिमान बाळगून आहे. एम्परर, फिनिक्स, ड्रॅगन हे त्यांचे देव आहेत. देशाविषयीची एकही उणी गोष्ट ते ऐकून घेत नाहीत. त्यामुळेच तळयाविषयीची खरी हकीगत ते कधीच उलगडत नाहीत आणि आपण ‘इतिहास असे सांगतो का’ असे वचारले तर ते त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष्य करतात. असो... .

लेकच्या परिसरात सिकाडा या कीटकांचे कर्णकर्कश्य संगीत सुरूच होते. देवदार, सावर, ओक अशी झाडे आखीवपणे लावली होती त्यामुळे संपूर्ण परिसर थंड होता. बाहेर मात्र रखरखीत उन होते. एका

बेटावरील देवळाचा सोन्याचा कळस चकाकत होता. असे म्हणतात कि त्या गावातील लोकांना कोणीतरी गरीब असे संबोधले. हे अपमानास्पद वाटून लोकांनी पैसे गोळा करून प्रयत्नपूर्वक देवळावर हा सोन्याचा कळस चढवला. हा चीनचा स्वर्ग आता सर्वांसाठी खुला झाला आहे. साधारण २००० पासून पर्यटक हळूहळू चीनकडे वळू लागले आहेत. बोट राईड दरम्यान पर्यटकांना माहिती देण्यासाठी बोटीवरील गाईड सतत चढ्या आवाजात चीनी भाषेत काहीतरी सांगत होता. आमच्या सारखे चीनी न कळणारे आम्ही तिघेच होतो. आमची गाईड पण तशी इंग्रजीत कच्चीच होती. तो काय बोलला आम्हाला काही कळले नाही. परंतु एक गोष्ट नक्की, बोटीत चढण्या उतरण्यात कोणतीही गडबड नाही, धक्का बुक्की नाही... बोटीतील व्यवस्था, वेळेचे भान, सगळं शिस्तीत... आम्ही बोटीतून उतरलो आणि एका बुद्धाच्या देवळात गेलो. लींगयीन हे चीनच्या १० प्रसिध्द बौध्द मंदिरांपैकी एक आहे.

soul’s retreat

शाक्यमुनी बुद्धा

भारतीय भिख्खूने याला ‘आत्म्याचे मंदिर’ असे नाव दिले. तिथली मूर्ती खूप प्रचंड मोठी होती. साक्यमुनीची ही मूर्ती ७५ फुटाची आहे. तेथे एक भारतीय साधू येऊन राहिला होता म्हणे. त्याची आठवण म्हणून एक ठिकाण आहे. डोंगरात कोरलेल्या बुद्धाच्या मूर्ती सुध्धा सुंदर आहेत. परंतु प्रत्येक सुंदर ठिकाण पाहतांना आपल्याकडील सुंदर ठिकाणं नजरेसमोर येतात. कोरीव कमानीने नटलेली, पेंटीगने सजलेली अनेक देवळ आठवतात आणि त्या बरोबर आठवते, ती काही मोजकी ठिकाणं सोडता बाकीच्यांची झालेली दुरवस्था. अजंठा – एलोराची प्रकर्षाने आठवण झाली. हे सर्व पाहता पाहता दुपारचे ३ वाजले. जेवणासाठी उशीरच झाला होता. टूरने ठरविलेले आणि इतर हॉटेल्स देखील बंद झाली. पौंला हॉटेलच्या शोधात गाडी पळवीत होती. तळ्याला फेऱ्या मारत खूप पेट्रोल जाळले. अखेर ४ : ३० ला एक हॉटेल सापडले.

傣族村

तिथे जेवलो, चॉपस्टीकने जेवण्याचा यशस्वी प्रयोग केला (दिसते तेव्हढे अवघड नाही वाटले) आणि साधारण दोन – अडीच फुटावरून आपल्या कपामध्ये अचूकपणे चहा ओतणारी हॉटेल मधील मुलगी पाहून थक्क व्हायला झाले..असो. तेथील मार्केटमध्ये किरकोळ खरेदी करून लागलो परतीच्या वाटेला. ९ च्या सुमारास हॉटेलला पोचलो. थोडे ताजे-तवाने होऊन हॉटेल जवळच्या रस्त्यावर फिरलो. फळ घेतली. इथे बहुदा भारतीय लोकांना ‘ हाऊ मच’ असे ओळखतात कारण आपण किंमत विचारतांना ‘हाऊ मच’ असे म्हणतो. आमची भाषा आणि वेश यामुळे आम्ही एखाद्या दुकानात शिरलो अथवा रस्त्यावरील फळांचा भाव विचारला तेव्हा अनेक चौकस लोक गोळा झाले. रात्रीच्या १०:३० वाजता सुध्धा चांगली १५-२० माणसे गोळा झाली. माझी आणि मॅडमची हसून पुरेवाट... आजूबाजूच्या त्या माणसांना इंग्रजीचा एक शब्दही कळत नव्हता. हातवारे करूनही कळत नाही. केल्क्युलेटर वर किमतीचा आकडा लिहायचा,नोटा दाखवायच्या आणि बोटांनी किती पाहिजे ते सांगायचे असे करून अखेर संवाद साधला जात होता. हॉटेलकडे परतताना शांघायच्या या मध्यवर्ती ठिकाणी रस्त्यावर झोपलेली माणसे पाहून थोडे आश्चर्य वाटले. हॉटेलवर येऊन फलाहार केला आणि झोपलो.

२५ जुलै २००७ म्हणजे दुसऱ्या दिवशी आम्ही जाणार होतो 'यो - YO गार्डन' येथे. सामान आम्ही सकाळीच गाडीत टाकले होते. यो गार्डन हा खूप मोठा शॉपिंग एरिया होता . आम्ही दोन तास तेथे घालवले. छोटी छोटी पण बऱ्यापैकी खरेदी केली. खूप गर्दी होती. चायना मार्केटचा अर्थ खऱ्या अर्थाने कळला. परंतु बाहेरील किमती आणि येथील किमती आणि दर्जा यामध्ये फारसा फरक नव्हता.प्रचंड गर्दी आणि खूप उन... त्यामुळे आम्ही २ तासातच शिणलो. आणि आमच्यापैकी तसे शॉपिंगचे वेड असलेले कोणी नव्हते...तिथून निघून आम्ही गेलो 'जेड बुद्धा टेम्पल' आणि 'सेरिमनी टी हाउस' पाहायला. शांघाय च्या पश्चिमेकडील भागात असलेले हे देऊळ. कवींग राजवटी विरुद्धच्या उठावा दरम्यान मंदिर उध्द्वस्त झाले परंतु त्यावेळी जेडच्या बुद्धाच्या दोन मूर्ती मात्र वाचल्या. १९२८ मध्ये हे देऊळ पुन्हा बांधले गेले. एक बसलेला आणि दुसरा पहुडलेला अशा या त्या दोन मूर्ती आहेत. प्रत्येकजण हातात आपल्याकडील उदबत्तीच्या पुड्याप्रमाणे दिसणारे काहीतरी घेऊन गुढगे टेकून नमस्कार करीत होता. चार ऋतूंचे चार देव, त्यांच्या मूर्ती झाडाला बांधलेल्या. रंगीबिरंगी पट्ट्या अनेक लोक येऊन गेल्याचे दाखवीत होत्या. तरीही बुद्धाच्या देवळांमधला तोच तोचपणा जाणवत होता. जेवण करून आम्ही परस्पर विमानतळावर गेलो. पौंला ने आम्हाला चेक इन करून दिले, तिच्या बरोबर एक फोटो काढला आणि आम्ही तिला बाय केले. आमची संध्याकाळी ६ ची फ्लाईट

होती.आमचा परतीचा प्रवास सुरु झाला होता ही जाणीव होत होती. अचानक आमचे लक्ष समोरील स्क्रीन वर गेले आणि दिसले कि आमची फ्लाईट रद्द झाली होती. पाटी फक्त एव्हढेच सांगत होती, कुठेही घोषणा नाही, किवा व्यवस्थितपणे सतत दिसणारी पाटी नाही, मदत नाही, ज्याचा तो...तेथील एका कर्मचाऱ्याला तिकीट दाखवून विचारले तर त्याने आम्हाला एका नवीन गेटकडे जाण्यास सांगितले. तिथे शांघाय-हॉंगकॉंगच्या दोन फ्लाईट एकत्र केल्या आहेत असे समजले. नवीन गेट समोरील लाउंज मध्ये बसलो गोंधळ पहात. आता फ्लाईटची वेळ दाखवत होते ७:१५ ची. प्रचंड गोंधळ होता. आपल्याकडे लावलेली एस टी रद्द झाली की कसा होतो अगदी तसाच...नुसता किरट्या आवाजातील कलकलाट..कोणाचेतरी भांडण सुरु झाले. हे सर्व होत असतांना दिलगिरी नाही, माफी वगैरे तर नाहीच...आम्हीही या गोंधळात बसून होतो. गम्मत बघत...मध्येच सांगतील तेव्हा लाईन लावत होतो, पण तसे मजेत होतो. अखेर आमचे आधीचे बोर्डिंग पास घेऊन नवीन बोर्डिंगपास आम्हाला मिळाले म्हणजे आता आम्ही हॉंगकॉंगला जाणार हे नक्की. आता पुढे धावून सीट वगैरे पकडायची नसावी असा विचार केला आम्ही...नशीब तसे काही नव्हते...या गोंधळातून आम्ही अखेर रात्री ९:३० ला हॉंगकॉंग विमानतळावर उतरलो. हॉटेलचे बुकिंग नव्हतेच त्यामुळे चौकशी करत होतो. त्यावेळी हुसेन नावाच्या माणसाने आम्हाला हेरलं. आम्ही त्याला हॉटेल आणि तिथे जाण्यासाठी

टॅक्सी त्याचीपण चौकशी केली. त्याने आम्हाला अगदी मार्केटमध्येच असलेल्या ‘हॉटेल दादूल’ येथे आणून सोडले. हॉटेल तसे सुमारच होते परंतु मार्केट जवळ असण्याचा फायदाही होता. आम्हाला फक्त दोन रात्री आणि एक दिवस काढायचा होता. संपूर्ण दिवस दगदगीचा गेला होता त्यामुळे आम्ही लगेचच झोपलो. २६ जुलै २००७ ची सकाळ... आम्ही तसे आरामातच उठलो. कारण आज कुठे जायचे नव्हते. ब्रेकफास्ट करून ११:३० च्या सुमारास बाहेर पडलो. दिवसभर मार्केट मध्ये जवळजवळ ५ वाजेपर्यंत हिंडलो. जेवण बाहेरच केलं आणि उरलेली खरेदी संपविली. खरेदी हॉटेलवर ठेवायला आलो आणि परत बाहेर पडलो ‘द पीक’ पाहायला. यावेळी आम्ही मेट्रोने प्रवास केला. मेट्रो एक्स्चेंज या स्टेशनवर आलो. तिथून टॅक्सी करून पीक वर गेलो. अंधार होत आला होता. पीक म्हणजे, डोंगरावरून उंच उंच जात अगदी टोकावरील छोट्याशा पठारावर जायचे. तेथे पोचल्यावर उंचावरून होणारे हॉगकॉग दर्शन नयनरम्य होते. सगळीकडे शॉपिंगसाठी दुकानं, दिव्यांचा झगमगाट, किती माणस आणि काय खरेदी करतात कोणास ठाऊक... तरी तेथील वरचा मजला बंद झाला होता. पण एकूण सुंदर जागा होती. परतेपर्यंत रात्र झाली, ११ वाजले.खूप दमलो होतो. तिथल्या एका भारतीय रेस्टॉरंटमध्ये जेवलो. गेल्या ६ दिवसात हे असे जेवण मिळालेच नव्हते ना... आम्ही खुश झालो. आपल्यासारखे इथे चहाची टपरी, फळवाले, भजीवाले,एखादे छोटेसे दुकान अशा गोष्टी इथे

जवळजवळ नाहीतच. भारतीय रेस्टॉरंटपण फार मुश्किलीने मिळाले. तरी इथे भाषेचा प्रश्न चीन इतका वाईट नव्हता. हॉटेलवर येऊ झोपलो. २७ जुलै २००७, पुढचा दिवस, आज आम्ही निघणार...सकाळी उशीराच उठलो...आता फक्त सामानाची बांधाबांध करायची बाकी होती. आज आमच्याकडील खाण्याच्या गोष्टी संपविल्या. १० वाजता पुन्हा बाहेर पडलो बाजारावर शेवटचा हात मारायला... १२ ला परतलो. कारण हुसेनची टॅक्सी १२:३० ला आम्हाला विमानतळावर नेण्यासाठी येणार होती. १:३० वाजता एयरपोर्टवर... फ्लाईट होती दुपारी ४:३० ची.

पुन्हा एयर इंडिया, प्रवाश्यांना खायला प्यायला घालायला तयार होतीच... एकूणच टूर मधील गमती, खाणे, कॉन्फरन्स, चीन मधली माणसं , भाषेची गम्मत यावर चर्चा करीत, आराम करीत फ्लाईटचा वेळ मस्त गेला. अशा प्रकारे इन, मीन, तीनचा जगातील एका मोठ्या आणि अद्भूत देशातील प्रवास संपला.

डॉ. नीलिमा कुलकर्णी.

प्रा. डॉ. नीलिमा कुलकर्णी यांचे अरण्यानुभव वाचण्यासाठी खालील कव्हरवर क्लिक करा

दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण…

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com